लग्न बस्त्याची खास सोय
प्रोप्रा. आर. एन. शिंगवी
महावीर क्लॉथ स्टोअर्स
रेडीमेड | होजिअरी | सुटींग | शर्टींग | साड्या
कोल्हार बु।।, ता. राहाता, जि. अ.नगर.
M. 9860329429, 9822595353

दैनिक
# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक २८ वा | शनिवार, दि. ०७ मार्च २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

मौल्यवान नात्यांसाठी मौल्यवान दागिने
विश्वासाची परंपरा जपणारे
देडगांवकर सराफ
झेड.के.मार्केट, नागेबाबा बँकेजवळ, कोल्हार बु।।
दीपक ९८९०३९९९९९ | रोहित ९७६६७८७२७४

**आजचे हवामान**
कमाल 36°C | किमान 19°C

पेट्रोल 103.50 | डिझेल 90.03

सोने 1,59,583 | चांदी 2,61,904

# राज्याची ‘विकासझेप’


## ■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून राज्याचा अर्थसंकल्प सादर ■ शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतची कर्जमाफी



### लाडकी बहीण योजनाही अव्याहत सुरू राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**
**मुंबई** : राज्याचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला. त्यात त्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकित असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची घोषणा केली. त्याचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना लाभ होण्याची शक्यता असून राज्याच्या अर्थसंकल्पातून राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची घोषणा केली असली तरी लाडक्या बहिणींच्या अर्थसहाय्यतेत मात्र कोणतीही वाढ केली नाही. ही योजना अशीच अव्याहत सुरू राहील, असे ते म्हणाले. फडणवीस यांनी अर्थसंकल्पात याशिवायही अनेक योजना व तरतुदींची घोषणा केली आहे. देवेंद्र फडणवीस अजित पवार अर्थसंकल्प जाहीर करताना म्हणाले की, अजित पवार यांच्या निधनाने राज्याच्या प्रशासनात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांनी ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडला. अजित पवार व अर्थसंकल्प हे नाते दृढ झाले होते. त्यांच्या करड्या शिस्तीमुळेच महाराष्ट्राची वित्तीय स्थिती कठीण काळात स्थिर राहिली. (पान ४ वर)



राज्याच्या अर्थसंकल्पात थापा मारायची लेवल वाढली आहे. मी जसे म्हटले की हे विकासाचे मृगजळ दाखवले आहे. २०४७ कोणी पाहिले आहे? आत्ता शेतकऱ्यांच्या हातात काय पडणार आहे, आत्ता जो मध्यमवर्गीय आहे त्याच्या हातात काय पडणार आहे, जो नोकरदार आहे, तरुण-तरुणी जे शिक्षण घेऊन नोकरीच्या शोधात जाणार आहेत त्यांना काय मिळणार आहे? नुसत्या योजना जाहीर केल्या आहेत. त्या योजनांसाठी निधी कुठून आणणार? असा प्रश्न आहे.
**- उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री**



राज्य सरकारच्या कर्जमाफीच्या घोषणेचे स्वागत केले असले तरी ती अपुरी आहे. ३० जून २०२६ पर्यंतचे सर्व कर्ज माफ करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात आली होती. मात्र सध्याच्या निकषांमुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी या योजनेपासून वंचित राहू शकतात. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देणे ही त्यांची बोळवण आहे. त्यामुळे सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करून सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळेल असा बदल करावा.
**- अजित नवले, राज्य सरचिटणीस, किसान सभा**



सरकारचा अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्राचा नसून केवळ मुंबई आणि एमएमआर क्षेत्रासाठी असल्यासारखा वाटतो. पुणे, ठाणे आणि मुंबईतील प्रकल्पांवरच सर्व भर देण्यात आला असून उर्वरित महाराष्ट्र वाऱ्यावर सोडला आहे. ग्रामीण भागातील जनतेसाठी, विशेषतः नंदुरबारसारख्या दुर्गम जिल्ह्यांसाठी या बजेटमध्ये कोणतीही ठोस तरतूद नाही.
**- विजय वडेट्टीवार, विधिमंडळ नेते**



राज्य सरकारने जाहीर केलेला अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांची निराशा करणारा आहे. मोठमोठी आश्वासने असणाऱ्या या अर्थसंकल्पातून कर्जमाफीची जी घोषणा झाली आहे ती अगदी तुटपुंजी आहे. सरकारने राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज विळख्यातून मुक्त करताना सरसकट कर्जमाफी करणे आवश्यक आहे.
**- बाळासाहेब थोरात, माजी महसुल मंत्री**



फडणवीस सरकारची कर्जमाफी तकलादू असून शेतकऱ्यांचा विश्वासघात केला. ऑक्टोबर महिन्यात शेतकरी आंदोलनानंतर झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण कर्जमाफी केली जाईल, असे आश्वासन दिले होते. मात्र आता केवळ दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केल्यामुळे अनेक शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार आहे.
**- राजू शेट्टी, माजी खासदार**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा अर्थसंकल्प सादर केला असून राज्याला दिशा देणारा दिशादर्शक अर्थसंकल्प म्हणून याकडे पाहावे लागेल. महाराष्ट्राचा पाया रचणारा अर्थसंकल्प मत्स्य, बांबू,उद्योग क्षेत्र डिजिटल व्यासपीठ, कृषी व कृषीपूरक, ग्रामीण विकासासाठी घरकुल, सेवा क्षेत्र,प्रगतिशील शाश्वत सर्वमावेशक आणि सुशासन या चतुसूत्रिवर विकसित महाराष्ट्र २०४७ चे ध्येय ठेवण्यात आले आहे. हा अर्थसंकल्प एक आदर्श अर्थसंकल्प आहे.
**- स्नेहलताताई कोल्हे, माजी आमदार**



यंदाचा अर्थसंकल्प आदरणीय अजितदादांना समर्पित करून, दादांना अभिप्रेत असणारा विकसित महाराष्ट्राचा पाया रचणारा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल महायुती सरकार व मुख्यमंत्र्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार मानतो. २०४७ मधे विकसित भारताचा संकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोडला आहे. त्याच धर्तीवर विकसित महाराष्ट्राचा वेध घेणारा आणि पायाभरणी करणारा यंदाचा अर्थसंकल्प आहे.
**- सुनील तटकरे, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

## संमिश्र

### इराणचे इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ले

**तेल अवीव :** आज अमेरिका-इस्रायल-इराण युद्धाचा सातवा दिवस आहे. इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा २२ वा मारा केला आहे आणि कुवेतमधील एका अमेरिकन लष्करी तळाला आत्मघाती ड्रोनने लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने सांगितले की ऑपरेशन ट्रू प्रॉमिस-४ चा २२ वा मारा इस्रायलच्या ताब्यातील प्रदेशातील भागांना लक्ष्य करत होता. खोरमशहर-४, खैबर आणि फताह क्षेपणास्त्रे यांसारखी प्रगत क्षेपणास्त्रे डागण्यात आली. त्यांच्या भूदलाने कुवेतमधील अमेरिकन तळांवर ड्रोन हल्ला केला.

### तर भारतात स्वयंपाक गॅसची टंचाई

**नवी दिल्ली :** इराण-इस्रायल युद्ध वाढल्यास भारतात स्वयंपाकाच्या गॅसची (एलपीजी) टंचाईही वाढेल. या परिस्थितीचा विचार करून सरकारने आपत्कालीन अधिकारांचा वापर करत देशातील सर्व तेल शुद्धीकरण कंपन्यांना एलपीजीचे उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. रॉयटर्सच्या अहवालानुसार, मध्य पूर्वेतील वाढता तणाव आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. हाच धोका लक्षात घेऊन सरकारने गुरुवारी रात्री उशिरा आदेश जारी केला. रिफायनरी कंपन्या त्यांच्याकडील प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर फक्त स्वयंपाकाचा गॅस (एलपीजी) बनवण्यासाठी करतील.

### भारताने चौथ्यांदा अंतिम फेरीत

**मुंबई :** भारताने चौथ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गुरुवारी झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात संघाने इंग्लंडचा ७ धावांनी पराभव केला. २००७, २०१४ आणि २०२४ मध्येही संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर इंग्लंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. टीम इंडियाने २० षटकांत ७ गडी गमावून २५३ धावा केल्या. २५४ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडला २० षटकांत ७ गडी गमावून २४६ धावाच करता आल्या. जेकब बेथेलने ४८ चेंडूंत १०५ धावांची खेळी केली.

# आ. पवारांनी घेतली उपमुख्यमंत्र्यांची भेट

## सखोल तपासाची मागणी; अजित पवार अपघात प्रकरण

**जनता आवाज वृत्तसेवा**
**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली आहे. अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाच्या योग्य तपासाची मागणी त्यांच्याकडून करण्यात आली आहे. यापूर्वी रोहित पवार यांनी या प्रकरणामध्ये मुख्यमंत्र्यांची देखील भेट घेत सविस्तर मााहिती दिली होती.

व्हिएसआर कंपनी जर एका विमानाच्या बाबतीमध्ये कामचुकारपणा करत असेल तर दुसऱ्या विमानाच्या बाबतीमध्ये कामचुकारपणा करु शकतील. असे कोणाचा सांगायचा प्रयत्न आहे का? की अजित पवार यांच्याच विमानामध्ये कामचुकारपणा केला तो माहित होता मग त्यामागे काही षड्यंत्र होते घात करण्याचे कुठेतरी प्लॅनिंग झाले होते (पान ४ वर)



### गुन्हा दाखल करा : आ. पवार

अजित पवारांना आपल्याला न्याय मिळवून देण्यासाठी साधा गुन्हा दाखल होत नाही. घाटकोपरमध्ये २०१९ मध्ये विमान अपघात झाला होता त्यावेळी किरीट सोमय्या गेल्यावर गुन्हा घेण्यात आला. त्या गुन्ह्यामध्ये आणि या गुन्ह्यामध्ये काहीच फरक नाही. पण अजितदादा गेल्यावर त्यांचा गुन्हा पोलिस प्रशासन घेत नसेल तर त्याला आपण काय म्हणणार. जे सत्तेत असेल त्यांची थोडी ताकद असेल तर त्यांनी ती वापरत गुन्हा तरी दाखल होऊ दिला पाहिजे. दिल्लीत जाऊन या प्रकरणी जर मोठ्या नेत्यांकडे पाठपुरावा केला तर नक्कीच फायदा होईल

# राहुरीसह बारामतीत लवकरच पोटनिवडणूक?

## बारामती पोटनिवडणूक चर्चेत; राहुरीत राजकीय हालचालींना वेग

**जनता आवाज वृत्तसेवा**
**मुंबई** : महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची मानली जाणारी बारामती विधानसभा जागा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झाली आहे. त्यामुळे या जागेवर लवकरच पोटनिवडणूक होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील दोन विधानसभा पोटनिवडणुकीची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बारामतीसोबतच अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी या विधानसभा मतदारसंघासाठीही पोटनिवडणूक होणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघांमध्ये राजकीय



हालचालींना वेग आला आहे.

विशेष म्हणजे देशातील पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसोबतच महाराष्ट्रातील या दोन जागांची निवडणूकही जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे बारामती आणि राहुरी या दोन्ही ठिकाणी आगामी काळात राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बारामती आणि राहुरी या दोन्ही विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीची घोषणा मार्च महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती मतदारसंघ रिक्त झाला असून त्या जागेसाठी निवडणूक घेणे आवश्यक झाले आहे.

दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाचे राहुरीचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरी मतदारसंघही रिक्त झाला आहे. त्यामुळे या दोन्ही जागांवर एकाच वेळी पोटनिवडणूक होण्याची शक्यता अधिक मानली जात आहे. दरम्यान, मार्च महिन्यात पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि केरळ या पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. (पान ४ वर)

### पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता

दरम्यान, बारामतीतील पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे अनेक राजकीय पक्ष सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देणार नाहीत, अशी चर्चा सुरू आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनीही याबाबत प्रतिक्रिया देताना बारामतीची निवडणूक बिनविरोध होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. तर राहुरी विधानसभा मतदारसंघांमध्ये अद्याप उमेदवार जाहीर नसला तरी येथील विधानसभा पोटनिवडणूक ही काटे की टक्कर होणार असल्याचे चिन्हे आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जगातील अद्वितीय राजे

## अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील; कोल्हार येथे तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**
**कोल्हार** : अठरापगड जातीधर्मातील लोकांना सोबत घेऊन सुराज्य तसेच स्वराज्य स्थापन करणारे छत्रपती शिवाजी महाराज हे जगातील अद्वितीय राजे होते. त्यामुळे सर्वांनी प्रथम त्यांचे चरित्र अभ्यासावे आणि त्यानंतरच त्यांच्या विषयी बोलण्याचे धाडस करावे, असे प्रतिपादन कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी केले.

दरम्यान तिथीनुसार साजऱ्या करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कोल्हार भगवतीपुर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

खर्डे पाटील पुढे म्हणाले की, सध्या समाजात काही वाचाळवीरांकडून महाराजांच्या नावाचा आधार घेऊन अयोग्य वक्तव्ये केली जात आहेत. अशा वक्तव्यांकडे दुर्लक्ष करून समाजात परस्परांमध्ये एकोपा आणि ऐक्य कसे टिकून राहील याकडे लक्ष देण्याची नितांत गरज असल्याचे सांगत सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी भगवती माता देवालय ट्रस्टचे अध्यक्ष भाऊसाहेब खर्डे, कोल्हार बु.चे माजी सरपंच अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील, कोल्हार भगवतीपुरचे सरपंच दत्तात्रय राजभोज, कोल्हार बुद्रुकचे उपसरपंच गोरख खर्डे, उपसरपंच प्रकाश खर्डे, कोल्हार भगवतीपुर व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अजित मोरे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे उपजिल्हाप्रमुख अनिल बांगरे, जेष्ठ सामाजिक



कार्यकर्ते वसंतराव मोरे, डी. के. खर्डे, माधवराव मोरे, अनिल शंकरनाना खर्डे, संजय शिंगवी,ज्ञानेश्वर खर्डे, स्वप्नील निबे, बापूसाहेब कडसकर, ऋषिकेश खांदे, भरत खर्डे, पंढरीनाथ खर्डे, ज्ञानेश्वर शेळके, आबा राऊत, अनिल हिरानंदानी, विजय मोरे, सुभाष शेळके, श्याम गोसावी, पत्रकार गणेश सोमवंशी, अरुण बोरुडे, संतोष टेकाडे, राजेंद्र कापसे, सुधाकर राऊत, परिश्रम थेटे, मच्छिंद्र जाधव, सुनिल बोरुडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ग्रामस्थ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवजयंती यशस्वीतेसाठी यांचे परिश्रम

शिवजयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी शिवसेना कोल्हार शहर प्रमुख विजय गोहर, शिवसेना तालुका संघटक संतोष जोर्वेकर, युवराज बांगरे, सागर बांगरे, योगेश कोरडे, सागर मोरे, सचिन कोळसे, हर्षद मिजगुले आदींसह शिवसेना पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कोपरगावला अर्थसंकल्पात २५ कोटींची भेट

## आ. काळे यांचा पाठपुरावा यशस्वी

**जनता आवाज वृत्तसेवा**
**कोळपेवाडी** : कोपरगाव विधानसभा मतदार संघातील दळण-वळणाच्या सोयी-सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आ. आशुतोष काळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडे मतदारसंघातील पायाभूत सुविधांबाबत आग्रही मागणी केली होती. या मागणीला यश आले असून सन २०२६-२७ च्या राज्य अर्थसंकल्पामध्ये मतदारसंघातील महत्त्वाच्या रस्ते आणि पुलांच्या कामांचा समावेश करून २५ कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा करण्यात आली आहे.



कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागांना रस्त्यांचा समावेश आहे. या रस्त्यांची व पुलाची अत्यंत दुरवस्था झाली असून राज्य शासनाने राममा २२२ तोलारखिंड कोतुळ सावरचोळ संगमनेर तळेगाव कोपरगाव उक्कडगाव वैजापूर रस्ता (रा.मा.६५) किमी ९०/५०० ते १०१/२५० (झगडे फाटा ते तालुका हद्द खराब रस्त्याची लांबी) मध्ये रस्ता सुधारणा करणे यासाठी १७ कोटी रुपये, भरवस फाटा चास देर्डे चांदवड रस्ता किमी २४२/०५० (रामा-७) (पटेल वस्ती शाजापूर पूल) वर पुलाचे बांधकाम (पान ४ वर)




आजचा इफ्तार - ६.४३
उदयाची सहेरी - ५.३१



# निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर कारवाई करा

## आ. काळेंची ग्रामविकासमंत्र्यांकडे मागणी; वारी गावातील पाण्याची टाकी कोसळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यातील वारी गावासह परिसराला पाणी पुरवढा करणारी पाण्याची टाकी दि. ५ रोजी कोसळली आहे. ही टाकी १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सन २०१५-१६ साली तयार करण्यात आली होती. बांधकामात निकृष्ट दर्जाचे मटेरियल आणि तांत्रिक चुकांमुळे टाकी मुदतीच्या आत कोसळली असल्याने संबंधित ठेकेदार आणि तत्कालीन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आ. आशुतोष काळे यांनी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, अहिल्यानगर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

### ठेकेदार-अधिकाऱ्यांवर कारवाई करा

२०१५-१६ झालेल्या या टाकीच्या निकृष्ट कामाची चौकशी करून संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आ. आशुतोष काळे यांनी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, अहिल्यानगर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

वारी गावाला या टाकीतून नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा केला जात होता. मात्र संबंधित ठेकेदार आणि देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनी संगनमताने या टाकीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याने टाकी कोसळली आहे. या दुर्घटनेमुळे वारी गावाचा पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला असून ऐन उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ग्रामस्थांवर पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली आहे.

वारी ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी आ. काळे यांनी जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत २१.५२ कोटी किंमतीची वारी-कान्हेगाव पाणीपुरवठा योजना मंजूर करून आणलेली आहे. सदर योजनेचे सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले असून योजनेमध्ये वारी गावाकरिता एकूण नविन ३ पाण्याच्या टाक्या नियोजित धरलेल्या आहे. काम पूर्ण झाल्यानंतर निश्चितच गावाचा पाणी प्रश्न मिटणार आहे.



# भरदिवसा शाळकरी मुलावर कोयत्याने वार

## मुसळवाडी येथील घटना; संशयित सीसीटीव्हीत कैद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : मुसळवाडी येथे भरदिवसा घरात घुसून शाळकरी मुलावर कोयत्याने वार केल्याची धक्कादायक घटना ३ मार्च रोजी दुपारी ४ वाजेच्या दरम्यान घडली आहे. याबाबत अज्ञातांविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान हल्लेखोर हे जवळच्या सीसीटीव्हीत कैद झाले असून त्यानुसार पोलीस तपास करीत आहेत.

कृष्णा सीताराम भुजाडी (रा. मुसळवाडी, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली. ३ मार्च रोजी कृष्णा भुजाडी यांचा मुलगा साई (वय १४) हा घरात असताना घराच्या पाठीमागून अज्ञात दोघे जण आले. त्यांनी साई याचे तोंड दाबून कवळी मारण्याचा प्रयत्न केला.



**पुढील तपास उपनिरीक्षक सप्तर्षी करीत आहेत.**

त्याचवेळी त्यांच्यातील एकाने कोपऱ्याने मारून लोटून देत घरात जात असताना दुसऱ्याने साई भुजाडी याच्या उजव्या पायाच्या बोटावर कोयत्याने वार करून जखमी केले. याबाबत दोन अज्ञातांविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या पुढील घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सप्तर्षी हे करीत आहेत.

# वडाळा महादेव शाळेत कॅमेऱ्याची तोडफोड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी अज्ञात व्यक्तीने शाळेच्या सुट्टी दरम्यान परिसरातील कॅमेऱ्याची तोडफोड व १ कॅमेऱ्याची चोरी केले आहे.

जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक नेहमीप्रमाणे सव्वा नऊ वाजता शाळेत आले असता ऑफिस समोरील सीसीटीव्ही कॅमेरा लटकताना आढळून आला. तसेच दुसरा अपेक्षा भिंतीलगतचा सीसीटीव्ही कॅमेरा चोरून नेल्याचे निदर्शनास आले. यावेळी मुख्याध्यापक यांनी घटनेची माहिती तात्काळ वरिष्ठ अधिकारी तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, ग्रामपंचायत सरपंच, पोलीस पाटील तसेच ग्रामविकास अधिकारी गटशिक्षणधिकारी यांना कळविली.

यावरून पोलीस पाटील तसेच ग्रामविकास अधिकारी यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच या संदर्भात रीतसर श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यात आली. यावरून पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस करत आहे.

# कारेगावात आज महाराजस्व समाधान शिबिर

## उपविभागीय अधिकारी आणि तहसील कार्यालयाचा पुढाकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : सामान्य नागरिकांना विविध शासकीय दाखले आणि महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नये, या उद्देशाने आज (दि. ८) रोजी श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव मंडळ स्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामुळे कारेगाव परिसरातील नागरिकांना विविध महसूल सेवा एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याची माहिती तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी दिली आहे. श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी आणि तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नागरिकांचे अनेक प्रश्न प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असतात, अशा प्रश्नांचा जलद गतीने निपटारा व्हावा, हा या शिबिराचा मुख्य हेतू आहे.

या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार नोंदींचा त्वरित निपटारा, ७/१२ दुरुस्ती, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती आणि डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ वाटप, उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र आणि नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे वाटप, अकृषिक परवानगी, ई-मोजणी अर्ज आणि भू-संपादनाबाबत मार्गदर्शन, सामाजिक अर्थसाहाय्य योजनांचा लाभ, पीएम किसान नोंदणी आणि ॲग्रीस्टॅक सुविधा, शालेय विद्यार्थ्यांसाठी आवश्यक दाखल्यांचे थेट वाटप, पुरवठा विभागाच्या योजना व रेशनकार्ड संबधित कामे, संजय गांधी निराधार योजना संबधित कामे आदी सेवा जागेवरच उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन महसूल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

> शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा आणि लोकांची कामे वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी हे शिबीर अत्यंत महत्त्वाचे आहे. कारेगाव परिसरातील नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.
>
> **- मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार**

# जमीन बळकावण्यासाठी मृतांचे बनावट दाखले

## नेवासा बुद्रुक येथील घटना; सेतू चालकांसह सहा जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा बुद्रुक येथील एका कुटुंबाची २१ एकर वडिलोपार्जित जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे बळकावण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मृत व्यक्तींचे बनावट मृत्यू दाखले आणि खोट्या वारस नोंदी केल्याचा ठपका ठेवत, नेवासा पोलिसांनी सेतू चालकांसह सहा जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी मोजेस संजय जाधव (रा. नेवासा खुर्द) यांची नेवासा बुद्रुक शिवारात २१ एकर जमीन आहे. ही जमीन त्यांचे पंजोबा केरु जाधव यांच्या नावावर होती. जाधव कुटुंब बाहेरगावी असल्याने वारस नोंदी प्रलंबित होत्या. फेब्रुवारी २०२६ मध्ये ऑनलाइन उतारा तपासला असता, त्यावर शरद पिटर जाधव आणि प्रमिला सचिन भोसले यांची नावे लागल्याचे समोर आले.

### महसूल विभाग गाफील की सामील?

एकाच जमिनीसाठी अनेक मृत्यू दाखले सादर होताना महसूल प्रशासनाला शंका का आली नाही? वारस नोंद आणि ई-फेरफार करताना कागदपत्रांची पडताळणी झाली का, असा सवाल उपस्थित होत आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज अहिरे करत आहेत.

तपासात सेतू चालक सचिन धोंगडे आणि संदीप मुठे यांनी बनावट कागदपत्रे तयार केल्याचे निष्पन्न झाले. केरु जाधव, पिटर जाधव आणि यशवंत जाधव या मृत व्यक्तींचे बनावट मृत्यू दाखले व प्रतिज्ञापत्रे तयार करण्यात आली. यासाठी सरपंच, पोलीस पाटील आणि सोसायटी अध्यक्षांचे बनावट सह्या-शिक्के वापरले गेले.

या बनावट कागदपत्रांच्या आधारे महसूल विभागाकडून ई-फेरफार मंजूर करून घेतला. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी शेवगाव येथील दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीखत नोंदवण्यात आले. यावेळी बनावट वारसदार उभे केले असून, दोन्ही सेतू चालक त्यात साक्षीदार म्हणून उपस्थित होते. यात जमिनीवर अतिक्रमण करणारे संजय भगत आणि मीना जाधव यांचाही सहभाग असल्याचा आरोप आहे.

# राष्ट्रीय पातळीवर डॉ. पारखे यांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा आणखी एक झळाळता तुरा खोवला गेला आहे. कर्जत येथील सुप्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. अभिलाषा पारखे यांना वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा न्यूरो-ऑफ्थाल्मॉलॉजी तसेच पीडियाट्रिक ऑफ्थाल्मॉलॉजी व स्ट्रॅबिस्मस या विषयांमध्ये फेलोशिप ऑफ द ऑल इंडिया कॉलेजियम ऑफ ऑफ्थाल्मॉलॉजी हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा सन्मान माजी मुख्य न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांच्या हस्ते प्रदान झाल्याने या गौरवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारत मंडपम येथे पार पडलेल्या समारंभात डॉ. अभिलाषा पारखे यांना सन २०२५-२६ साठी न्यूरो-ऑफ्थाल्मॉलॉजी तसेच पीडियाट्रिक ऑफ्थाल्मॉलॉजी व स्ट्रॅबिस्मस या दोन विषयांमध्ये प्रदान करण्यात आला. नेत्ररोग क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण संशोधन, रुग्णसेवा आणि उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा बहुमान देण्यात आला आहे.

### कर्जत तालुक्यासाठी ऐतिहासिक गौरव

या स्वरूपाचा आणि या स्तराचा पुरस्कार यापूर्वी कर्जत तालुक्याला मिळालेला नव्हता. त्यामुळे केवळ डॉ. अभिलाषा पारखे यांचाच नव्हे, तर संपूर्ण कर्जत तालुक्याचा हा अभिमान मानला जात आहे. ग्रामीण भागातून जागतिक दर्जाचा वैद्यकीय सन्मान मिळणे ही प्रेरणादायी बाब ठरत असून, नव्या पिढीतील डॉक्टरांसाठी हा आदर्श ठरणार आहे.

# टाकळीभानमध्ये व्यायामशाळेचे उद्‌घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**टाकळीभान** : श्रीरामपुर तालुक्यातील टाकळीभान येथे जिल्हा क्रिडा विभागाच्या माध्यमातुन ७ लक्ष रुपये निधीच्या नुतन व्यायामशाळेचा उद्घाटन सोहळा पार पडला.



जिल्हा क्रिडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते हा व्यायामशाळा उद्घाटन समारंभ पार पडला. यावेळी व्यासपीठावर योगेश हजारे, अस्लम इनामदार, शिवम पटारे, सरपंच अर्चना रणनवरे, उपसरपंच कान्हा खंडागळे, किरण धुमाळ, दिलीपराव लोखंडे, बापुसाहेब नवले, अर्जुन राऊत, मयुर गव्हाणे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

खुरंगे म्हणाले की, मोबाईल,टिव्ही आणि समाजमाध्यमांमुळे मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मैदानावर व व्यायामशाळेत मुलांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे नविन झालेल्या व्यायामशाळेत गावातील प्रत्येक तरुणाने येऊन आपले शरीर व आरोग्य घडवले पाहीजे. टाकळीभान गावाने कबड्डीची परंपरा अनेक वर्षांपासुन जपली आहे. शाळेतून घडलेले अस्लम ईनामदार व शिवम पटारे हे जिल्ह्यासह राज्याचा नावलौकीक वाढवत असल्याचे ते म्हणाले.

यावेळी राहुल कोकणे, वसीम ईनामदार, सतिश कांगुणे, संदिप जावळे, गणेश इथापे, प्रशांत कोकणे, किरण बोडखे, अमोल चितळे, सुभाष सपकाळ, मनिष वेताळ, रामा शिंदे, रामा बोडखे, सनी जाधव आदींसह ओन्ली साई क्रिडा मंडळाचे खेळाडु व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रस्तावना संदीप जावळे यांनी केली. सुत्रसंचलन राहुल कोकणे तर आभार वसीम ईनामदार यांनी मानले.

# डॉ. चोथाणींची सेवा उल्लेखनीय : सौ. विखे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर** : बालकांचे रोग निदान आणि उपचार हे सर्वात आव्हानात्मक काम असताना डॉ. कृष्णकुमार चोथानी यांनी गेली पन्नास वर्षे ते अचूकपणे केले. बालकाला त्यांचा स्पर्श झाला तरी त्याचे आरोग्य सुधारते असा अनेकांचा अनुभव आहे. त्यांची ही सेवा असाधारण असल्याचे गौरवोउद्गार जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी काढले.

तर संत तुकाराम यांची भक्ती आणि कठोर वैराग्य यामुळे ते वारकरी संप्रदायाचे कळस बनल्याचे प्रतिपादन भागवताचार्य संगीताताई कोरडे यांनी केले. राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज सेवा ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित तुकाराम बीज उत्सवात त्या बोलत होत्या.

यावेळी प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या विश्वस्त सुवर्णाताई विखे, भारत महाराज धावणे, डॉ. बधे, विकास सोसायटीचे उपाध्यक्ष नाना म्हस्के, सरपंच कल्पना मैड, माजी सरपंच लक्ष्मण बनसोडे, वसंतराव विखे, भागवतराव विखे, मधुकर विखे, रवींद्र धावणे, नामदेव वाबळे, ट्रस्टचे अध्यक्ष देवीदास म्हस्के, प्रवरा डॉक्टर्स असोसिएशन लोणीचे सदस्य उपस्थित होते.

डॉ. चोथानी यांना मानपत्र देऊन शालिनीताई विखे व मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले. प्रारंभी अनिल विखे यांनी स्वागत केले. गेणुजी सुर्वे यांनी प्रास्ताविक केले. रामचंद्र निंबाळकर यांनी व्यक्ती परिचय करून दिला. दादासाहेब म्हस्के यांनी आभार मानले तर यमन पुलाटे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सुवर्णाताई विखे पाटील यांच्या वतीने उपस्थितांना महाप्रसाद देण्यात आला.




> गरीब कुटुंबातून आलेल्या डॉ. चोथानी यांनी आपल्या बुद्धिमतेच्या जोरावर हजारो बालकांना आरोग्यदायी जीवन दिले. अचूक निदान आणि योग्य उपचार यामुळे ते बालकांचे देवदूत बनले. आयुष्यात संघर्ष करीत त्यांनी वाटचाल केली आहे.
>
> **- शालिनीताई विखे पाटील**

# निळवंडे कालव्याच्या चाऱ्यांचे काम प्रगतीपथावर

## जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्या प्रयत्नातून निळवंडे कालव्याच्या कामाला गती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : गेली अनेक वर्ष भिजत पडलेले निळवंडे धरणाचे पाट चाऱ्यांचे प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अविरत परिश्रमातून मार्गी लागलेले असताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून ज्या भागाला कालव्याचे पाणी जात नाही, अशा भागांना निळवंडे कालव्याचे काम राहुरीपासून ते अकोलेपर्यंत अतिशय जोराने चालू आहे.

तसेच हे काम काही भागात पाणी जात नाही. तेथे ही अतिशय प्रगतीपथावर आहे. संगमनेर तालुक्यातील खळी गावामध्ये २६ किलोमीटर लांबीचे चारीचे काम जोरात सुरू आहे. असे कधीही वाटले नव्हते हे काम नवीन पद्धतीने (इस्राईल टेक्नॉलॉजी) भूमिगत चाऱ्यांचे काम खळी येथे चालू असल्याने शेतकऱ्यांना थेट शेताच्या बांधावर चाऱ्यांच्या रूपाने पाणी मिळणार आहे.

या आशेने शेतकरी वर्ग अतिशय आनंदी झाला असून शासनाच्या नियोजनानुसार येत्या १ ते १.५ वर्षात शेतीला मुबलक पाणी उपलब्ध होईल. त्यामुळे शेतकरी अतिशय उत्साहित असून मंत्री विखे पाटील यांचे आभार मानत आहे.

### ग्रामस्थांनी मानले पालकमंत्र्यांचे आभार

खळी येथील सुरेशराव नागरे, सरपंच विलास वाघमारे, सचिन आव्हाड, हौशीराम नागरे, गोरख घुगे, गोरख चकोर, ज्ञानदेव मुंढे, भास्कर मुंढे, भास्कर उगलमुगले, अण्णा कांगणे, रमेश सानप, बाळासाहेब वाघमारे, शंकर नागरे, किशोर वाघमारे, शिवाजी लबडे, भानू कांगणे, बबन कांगणे, ज्ञानेश्वर लबडे, अशोक वाघमारे, तुकाराम घुगे, बाजीराव घुगे, कुंडलिक उगलमुगले, कारभारी नागरे, संतू सानप, सखाराम बोऱ्हाडे, नंदू खरात, नामदेव गिते, सोपान उगलमुगले, भानू उगलमुगले, बाबासाहेब वाघमारे, कारभारी वाघमारे, बबन तांबे आदी ग्रामस्थांनी पालकमंत्र्यांचे अभिनंदन केले.

# प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासन ॲक्शन मोडवर

## कायदेशीर कारवाईचा इशारा; ३७ जणांना नोटीसा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आदींना डीजे डॉल्बीच्या कर्कश्य व असह्य अशा आवाजामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाकडून संबंधितांना वारंवार सूचना देण्यात येतात. परंतु या सूचनांकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. त्यामुळे अशा प्रकारचे ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी शहर विभाग पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले आहे.

शाळा, कॉलेजेस, हॉस्पिटल, धार्मिक स्थळे आदी परिसरामध्ये कर्कश डीजे डॉल्बीचा आवाज करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्या विरुद्ध पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ त्याचबरोबर ध्वनी प्रदूषण (विनिमय व नियंत्रण) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिला आहे.



या संदर्भात शहरातील ३७ डीजे/डॉल्बी चालक-मालक, मंगल कार्यालयांचे मालक, जनरेटर वाहन मालक यांना भारतीय दंड संहिता कलम १६८ प्रमाणे नोटीसा बजावण्यात आल्या असल्याचे देखील डॉ. टिपरसे यांनी सांगितले.

नगर शहर परिसरामध्ये कोठेही अशा प्रकारे ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन करून डीजे व डॉल्बी सिस्टीमद्वारे कर्कश्य व असह्य आवाज करीत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ नजीकच्या पोलीस स्टेशनला माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल, असे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे म्हणाले.

# जिल्हा बँक निवडणुकीच्या हालचालींना वेग

## मतदारयादी तयार करण्याचे आदेश; समिकरणे कशी जुळणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा बँकेच्या मतदार याद्या तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहे. या आदेशानंतर बँकेच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. राज्यात ज्या मोजक्या जिल्हा बँका आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत मानल्या जातात, त्यामध्ये नगरची जिल्हा बँक अग्रणी आहे. सहकार क्षेत्रातील जुन्या मातब्बरांनी बँकेला आर्थिक शिस्त लावली. त्याचा उपयोग आजही होत आहे. आता बँकेने अत्याधुनिकतेकडे वाटचाल सुरू केली आहे.




शेतकऱ्यांची बँक असा लौकिक सांगितला जात असला तरी बँकेवर साखर कारखानदारांचे वर्चस्व आहे. काँग्रेस एकसंघ होती, त्यावेळी पक्षातील दिग्गजांचे बँकेवर वर्चस्व होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर सहकारासह इतरही क्षेत्रात बाळासाहेब विखे-राधाकृष्ण विखे यांच्या विरोधात काँग्रेसमधीलच बाळासाहेब थोरात व शरद पवार गट एकत्र येत निवडणुका लढवू लागले.

जिल्हा बँक हे त्याचे मध्यवर्ती केंद्र ठरले. बँकेतील समीकरणांचे पडसाद जिल्हा परिषदेत उमटत. बाळासाहेब थोरात-शरद पवार गटाने बँकेवर दीर्घकाळ वर्चस्व ठेवले. राज्यातील राजकीय परिस्थिती बदलली, तसे त्याचे पडसाद जिल्हा बँकेत उमटू लागले.

तरीही सुरुवातीच्या टप्प्यात थोरात-पवार गटाने बँकेवरील प्राबल्य कायम ठेवले होते. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. त्याचा परिणाम बँकेवरही झाला आणि इतिहासात प्रथमच बँकेचे अध्यक्षपद भाजपकडे आले. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष घालावे लागले. आता जिल्ह्यातील शरद पवार गट कमकुवत झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने राज्य पातळीवरून लक्ष घालणारे, जिल्ह्याविषयी जाणकार नेतृत्व राहिले नाही. मंत्री राधाकृष्ण विखे यांचे वर्चस्व वाढलेले आहे.

माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचा विधानसभेत पराभव झाला असला तरीही सहकारातील त्यांचे प्राबल्य कमी झालेले नाही. भाजपमधीलच विवेक कोल्हे व विखे यांच्यातील वैमनस्याला धार आलेली आहे. थोरात-कोल्हे यांनी एकत्र येत विखेंच्या वर्चस्वाला गणेश कारखान्याच्या क्षेत्रात आव्हान दिले आहे. माजीमंत्री शंकरराव गडाख यांनी स्वतंत्र वाटचाल ठेवली आहे. विखे यांच्याशी सख्य नसलेल्या भाजपचेच विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी जिल्हा बँकेत लक्ष घालणार असल्याचे सुतोवाच केले आहे. शरद पवार गटाचे खासदार नीलेश लंके व बाळासाहेब थोरात यांच्यामध्ये सामंजस्य वाढलेले आहे. संचालक करण ससाणे विखे यांच्यापासून अंतर राखून आहेत.

### नवीन समिकरणे जुळणार

राज्यातील आणि जिल्ह्यातील बदललेली राजकीय परिस्थिती जिल्हा बँकेच्या निवडणुकीत नवी समीकरणे जुळण्यास बळ देणारी आहे. बँकेवर प्रामुख्याने साखर कारखानदारांचे वर्चस्व आहे. या कारखानदारांना केंद्र व राज्यातील सत्तेचा आधार हवा असतो. ही समीकरणे जुळताना हा मुद्दाही प्रबळ ठरणार आहे. उदय शेळके व शिवाजी कर्डिले या दोन्ही अध्यक्षांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना संचालक पद देण्यात आल्याने बँकेत नवे चेहरे आले. याशिवाय कारखान्याचे अध्यक्ष असलेले माजी खासदार डॉ. सुजय विखे यांचा बँकेत प्रवेश होणार का, याकडेही लक्ष लागलेले आहे.

# श्री गोरक्षनाथ मंदिर विद्युत रोषणाईने उजळले

## कलशारोहण सोहळ्यानिमित्त गडावर भक्तिमय वातावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथील डोंगरमाथ्यावर वसलेले श्री क्षेत्र गोरक्षनाथ मंदिर सध्या आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाले आहे. मंदिराच्या कलशरोहण सोहळ्यानिमित्त संपूर्ण गोरक्षनाथ गड परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांची मोठी गर्दी होत आहे. डोंगरमाथ्यावर असलेल्या या पवित्र मंदिरावर करण्यात आलेली रंगीबेरंगी विद्युत रोषणाई रात्रीच्या वेळी अत्यंत मनमोहक आणि आकर्षक दिसत आहे. मंदिर परिसरातील रोषणाई, सजावट आणि धार्मिक वातावरण पाहण्यासाठी दररोज सायंकाळी अनेक भाविक गडावर येत आहेत. या सुंदर रोषणाईमुळे गोरक्षनाथ गडाचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड हे नाथसंप्रदायातील अत्यंत पवित्र आणि श्रद्धास्थान असलेले धार्मिक स्थान म्हणून ओळखले जाते.

### स्वर्गीय वातावरणाचा अनुभव

डोंगरमाथ्यावरून दिसणारी रोषणाई आणि मंदिराचे दिव्य स्वरूप पाहताना भाविकांना जणू काही स्वर्गीय वातावरणाचा अनुभव मिळत असल्याची भावना अनेक भक्तांनी व्यक्त केली. त्यामुळे दररोज सायंकाळी मोठ्या संख्येने भाविक गोरक्षनाथ गडावर येऊन दर्शन घेत आहेत. कलशरोहण सोहळ्याचा ऐतिहासिक क्षण प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य भाविकांना लाभणार आहे.

# चव्हाणांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) घेतलेल्या परीक्षेत वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. किसन चव्हाण यांचे चिरंजीव स्वराज सुनीता किसन चव्हाण यांची पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



स्वराज चव्हाण सध्या रावेर (जि. जळगाव) नगर परिषद येथे कर निर्धारक प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. नोकरी सांभाळत त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली आणि आपल्या जिद्द, मेहनत व चिकाटीच्या जोरावर त्यांनी पोलीस उपनिरीक्षक पद मिळवले. स्वराज यांचे १२ वी पर्यन्त चे शिक्षण शेवगाव येथील रेसिडेन्शील हायस्कूल बी एस्सी पर्यन्त चे एस पी महाविद्यालय पुणे आणि एम एस्सी चि पदवी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घेतली आहे.

दरम्यान, प्रा. किसन चव्हाण यांचे दुसरे चिरंजीव सिद्धार्थ चव्हाण हे देखील उच्च पदावर कार्यरत असून ते भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयात पेटंट ऑफिसर म्हणून मुंबई येथे कार्यरत आहेत.प्रा. किसन चव्हाण यांच्या कुटुंबातील दोन्ही मुलांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# महायुती पदाधिकाऱ्यांकडून शिवरायांचे पुजन

## संगमनेर बसस्थानकात उभारला अश्वारूढ पुतळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सवाच्या निमित्ताने शिवसेना-महायुतीच्या वतीने आमदार अमोल खताळ यांच्या संकल्पनेतून संगमनेर बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या ठिकाणी सायंकाळी आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, बंधू राहुल खताळ तसेच मराठा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र देशमुख, शिवसेनेचे शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, भाजप शहराध्यक्ष पायल ताजणे यांच्यासह महायुती आणि विविध हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी हस्ते मंत्रोच्चारात शिवपूजन करून महाआरती करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही संगमनेर बस स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. ''शहरात अश्वारूढच पुतळा उभारला जाईल'' असे फलकही सर्वत्र झळकले आहे. बस स्थानकाच्या प्रवेशद्वाराजवळ हा पुतळा उभारल्या मुळे येणाऱ्या-जाणाऱ्या शिवभक्तांचे तो खास आकर्षण ठरला आहे.लहान मुलांपासून ते तरुण-तरुणी, महिला-पुरुष अशा सर्वच नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर फोटो काढत आपल्या मोबाईलमध्ये त्या क्षणांची छबी कैद केली. त्यामुळे संपूर्ण संगमनेरकरांसाठी हा पुतळा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.



# सावित्रीबाई फुले ज्ञानदीपला पुरस्कार जाहीर

## अध्यक्षा मालकर यांचा आज मुंबईत सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : महिलांच्या कल्याणासाठी आणि सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा गौरव महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने करण्यात येतो. यावर्षीचा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार कोपरगाव येथील सावित्रीबाई फुले ज्ञानदीप प्रतिष्ठान या संस्थेला जाहीर झाला आहे. शनिवारी (दि.७) जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (रवींद्र नाट्यगृह), प्रभादेवी, मुंबई येथे सकाळी ८:३० वाजता आयोजित एका विशेष सोहळ्यात संस्थेच्या अध्यक्षा संगीताताई मालकर हा पुरस्कार स्वीकारणार आहेत.



अहिल्यानगर जिल्ह्यात महिलांच्या प्रश्नांवर सावित्रीबाई फुले ज्ञानदीप प्रतिष्ठानने अत्यंत सातत्यपूर्ण आणि प्रभावी काम केले आहे. महिलांचे शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबन या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन आयोगाने या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी त्यांची निवड केली आहे.

''हा पुरस्कार भविष्यात महिलांच्या क्षेत्रात अधिक जोमाने काम करण्यासाठी नक्कीच प्रोत्साहन देईल,'' असा विश्वास महिला आयोगाने पत्राद्वारे व्यक्त केला आहे. या पुरस्कार सोहळ्यासाठी संस्थेच्या मुख्य पदाधिकाऱ्यांसह उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. राज्यस्तरावरील हा बहुमान मिळाल्याबद्दल संगीताताई मालकर आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन होत आहे.

# संत तुकाराम महाराज बिजोत्सव उत्साहात

## गोणेगावात गाथा पारायण व हरिनाम सप्ताहाची सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करजगाव** : नेवासा तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील विठ्ठल रुक्मिणी आध्यात्मिक केंद्रातील रामकृष्ण आश्रमामध्ये संत तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवानिमित्त आयोजित गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची सांगता झाली. आश्रमाचे प्रमुख महंत वेदमूर्ती भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाचा समारोप करण्यात आला.



यावेळी तुकाराम तुकारामचा नामघोष करत आणि पुष्पवृष्टी करून संत तुकोबारायांचा बिजोत्सव साजरा करण्यात आला.काल्याच्या कीर्तनात बोलताना भगवान महाराज जंगले शास्त्री यांनी संत तुकाराम महाराजांचे जीवनकार्य विशद केले. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी जगाच्या उद्धारासाठी गाथा ग्रंथाची निर्मिती केली. आज त्यांचा बिजोत्सव भारतासह विदेशातील वारकरी संप्रदायाचे अनुयायी साजरा करतात, ही तुकोबांविषयी असलेली आस्था असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यांचे सदेह वैकुंठगमन हे परमात्म्याशी एकरूपतेचे प्रतीक असून, मानव देह घेऊन ते निजधामाला गेल्याने भगवत्स्वरूप झाल्याचे त्यांनी सांगितले . कीर्तनप्रसंगी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन करण्यात आले. त्यानंतर काल्याची दहीहंडी फोडून आठ दिवस चाललेल्या या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली.

# राहात्यात नगरसेवकाला जीवे मारण्याची धमकी

## यात्रेतील पाळण्याचे टेंडरवरून झाला वाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : नगरपरिषदेचे नगरसेवक दशरथ अशोक तुपे यांना तुषार सदाफळ याने फोनवरून तसेच चौकात जमाव जमवून जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी राहता नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांनी पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन संबंधित आरोपीवर कठोर कारवाई करण्याची आणि तुपे यांना पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे. ५ मार्च २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास राहाता शहरातील तुषार गणेश सदाफळ नावाच्या व्यक्तीने नगरसेवक दशरथ तुपे यांना फोन केला. राहाता शहराचे ग्रामदैवत श्री वीरभद्र यात्रेनिमित्त पाळण्याचे टेंडर तुमच्या मर्जीतल्या लोकांना देतात का? आमच्या पोटावर पाय दिला असा जाब विचारत सदाफळ याने तुपे यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. धमकीचे सत्र एवढ्यावरच थांबले नाही तर रात्री १०:३० वाजेच्या सुमारास शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तुषार सदाफळ याने काही गुंड प्रवृत्तीची माणसे गोळा केली. तिथे जमा झालेल्या जमावाने नगरसेवक तुपे यांच्याबद्दल 'याला आज जिवंत मारून टाका, याचा काटाच काढू' अशी प्रक्षोभक विधाने करून मोठ्या प्रमाणावर आरडाओरडा केला.



### आरोपीकडून बंदुकीचा धाक

तक्रार अर्जात नमूद केल्यानुसार, तुषार सदाफळ याच्याकडे बंदूक असून, तो या शस्त्राचा धाक दाखवून दशरथ तुपे यांच्या मनात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. विशेष बाब म्हणजे, नगरसेवक दशरथ तुपे यांचा पाळण्याच्या टेंडर प्रक्रियेशी कोणताही थेट संबंध नसताना, केवळ राजकीय किंवा वैयक्तिक द्वेषातून हा प्रकार घडला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# पाथर्डीत ३५ रक्त, लघवी तपासणी केंद्र अनधिकृत

## पालकांची सीईओंकडे तक्रार, भंडारी यांचे चौकशीचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तिसगाव** : पाथर्डी तालुक्यातील ४७ पैकी १३ रक्त, लघवी तपासणी केंद्र अधिकृत असून, ३५ केंद्र हे अनधिकृत आहेत. सहलीला जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांची तपासणी या अनधिकृत केंद्रांवर होत असून, या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी पालकांनी केली आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद भंडारी यांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत.



४७ रक्त-लघवी तालुक्यात तपासणी केंद्रे असून, केवळ १३ केंद्रच अधिकृत आहेत. बाकी ३५ केंद्रचालकांकडे पदवी, विविध परवानग्या नसल्याची गंभीर बाब सरकारी तपासणीत समोर आली आहे. तसे अहवाल तालुका आरोग्य अधिकारी व तालुका वैद्यकीय अधीक्षकांनी दिले आहेत. या केंद्रातील अहवालावर तालुक्यातील सुमारे ५० वैद्यकीय व्यावसायिक रुग्णांवर उपचार करतात. त्यात काही गडबड झाल्यास रुग्णांचा जीव जाऊ शकतो.

शालेय सहलीला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करणे बंधनकारक असते. विद्यार्थ्यांची तपासणी शासकीय उपकेंद्रात मोफत केली जाते. एका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनी एका अनधिकृत केंद्रातून ५१ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी केली. तपासणीदरम्यान विद्यार्थिनीला त्रास झाल्याने पालकांना मनस्ताप सहन करावा लागला, तशी तक्रार पालकांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली. याप्रकरणी भंडारी यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तालुक्यातील अनधिकृत ३५ केंद्रांवर कारवाईसाठी यापूर्वी प्राथमिक आरोग्य उपकेंद्रामार्फत तीन-चार वेळा नोटिसा दिल्या आहेत. काहींनी केंद्र बंद केल्याचे लेखी आरोग्य अधिकाऱ्यांना दिले आहे. मात्र, प्रत्यक्षात रक्त-लघवी तपासणी केंद्र सुरूच आहे. उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना लेखी नोटीस देऊन हे केंद्र बंद करण्यास कळविले असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान दराडे यांनी सांगितले.

> *जिल्हा परिषदेकडे पालकांची तक्रार आली आहे. त्याची चौकशी करण्याचे आदेश देत आहे. ही बाब गंभीर आहे. अनधिकृत रक्त-लघवी तपासणी केंद्राची चौकशी केली जाईल.*
>
> **डॉ. आनंद भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी**

# तारकपूर आगारात शिवजयंती साजरी

## बसस्थानकावर पाणपोईचा झाला शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : तारकपूर आगार येथे तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच तारकपूर आगार बस स्थानक येथे प्रवासी व वाटसरूंसाठी पिण्याच्या पाण्याच्या पानपोईचेही उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले.



या प्रसंगी तारकपूर आगार व्यवस्थापक अभिजीत चौधरी, अविनाश कलापूरे, सहवाहक अधिक्षक सोनवणे, निरीक्षक तसेच कामगार सेना विभागीय अध्यक्ष गणेश फाटक, विभाग कार्याध्यक्ष नुर पटेल, विधी सल्लागार राजू घोरपडे, आगार अध्यक्ष जगन्नाथ कंठाळे, आगार सचिव रवी फाटक, अल्तमश खान, फिरोज सय्यद, तौफिक पठाण, सुरेश कासार, आदिनाथ गाडे, संभाजी जपकर, किशोर केरूळकर, रतन शिंदे, गणेश राऊत यांसह तारकपूर आगारातील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, स्वराज्याची संकल्पना आणि त्यांच्या आदर्शांचे स्मरण करून समाजाने त्यांच्या विचारांवर चालण्याचे आवाहन केले.

## संपादकीय

# स्टार्ट करार संपल्यामुळे...

अमेरिका आणि रशिया यांच्यामध्ये अण्वस्त्रांच्या संख्येसंदर्भात, अण्वस्त्रांच्या वापराच्या पारदर्शकतेसंदर्भात स्टार्ट ट्रिटी (स्ट्रॅटेजिक आर्म्स रिडक्शन ट्रिटी) कवा स्टार्ट करार हा एक महत्त्वपूर्ण करार झाला होता. त्यामुळे कराराद्वारे अमेरिका आणि रशिया यांच्या अण्वस्त्रांच्या संख्येवर आणि त्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवले जात होते. चार फेब्रुवारी रोजी हा करार संपुष्टात आला आणि त्याला अजून तरी कोणतीही मुदतवाढ देण्यात आलेली नाही. म्हणजे आता अमेरिका आणि रशिया यांच्या अण्वस्त्रांवर कोणतेही निर्बंध उरले नाहीत. कबहुना, आता जगातल्या कोणत्याही अण्वस्त्रधारी राष्ट्रावर कोणतीही बंधने राहिलेली नाहीत, असे खेदाने म्हणावे लागेल. या कराराबद्दल अधिक माहिती घेण्यासाठी आपल्याला इतिहासात थोडे डोकवावे लागेल. १९६२ मध्ये 'क्युबन मिसाईल क्रायसिस' झाला होता. त्याचे असे झाले की, १९६२ मध्ये क्युबावरून अमेरिका आणि त्यावेळच्या सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांमध्ये तीव्र संघर्ष निर्माण झाला होता. तो इतका टोकाला पोहोचला की दोन्ही देशांची अण्वस्त्रे एकमेकांच्या समोर आली. त्यालाच क्युबन मिसाईल क्रायसिस असे म्हणतात. तो संघर्ष टाळण्यासाठी दोन्ही देशांमध्ये चर्चा झाली. त्यावेळी दोन्ही देशांनी ठरवले, की दोघांच्या अण्वस्त्रांसंदर्भात चर्चा सुरू ठेवायच्या, कितीही संघर्ष झाला तरी अण्वस्त्रे वापरायची नाहीत, त्याचा ॲक्सिडेंटल वापर होऊ नये याची काळजी घ्यायची. त्यानंतर म्हणजे १९६३ पासून अमेरिका आणि तत्कालीन सोव्हिएत युनियनदरम्यान हॉटलाईन प्रस्थापित झाली होती. म्हणजे या दोन्ही देशांपैकी कोणाकडूनही एखादे अण्वस्त्र चुकून डागले गेले तर या हॉटलाईनद्वारे ते निष्प्रभ करता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली होती. या हॉटलाईनची मुदतही चार फेब्रुवारी रोजी संपुष्टात आली आहे. हा न्यू स्टार्ट करार अमेरिका आणि रशिया या दोन देशांदरम्यान १९६३ नंतर बऱ्याच काळाने म्हणजे २०१० मध्ये झाला. त्यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा तर रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन होते. आजघडीला जगभरात सुमारे नऊ हजार अण्वस्त्रे आहेत. त्यापैकी चार हजार अण्वस्त्रे रशियाकडे आहेत, साडे तीन हजार अण्वस्त्रे अमेरिकेकडे आहेत. चीनकडे सहाशे आहेत, पाकिस्तान, भारत, इंग्लंड आणि फ्रान्स या देशांकडेही अण्वस्त्रे आहेत. अमेरिका आणि रशियादरम्यान झालेल्या करारात आपापल्या अण्वस्त्रांच्या संख्येत घट करायची आणि दोघांकडेही १५५० पेक्षा अधिक अणवस्त्रे नसावीत असे ठरले होते. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक विशेष यंत्रणा तयार करण्यात आली होती. या यंत्रणेनुसार रशिया आणि अमेरिका वर्षातून १८ वेळा एकमेकांच्या अण्वस्त्रांचे परिक्षण करू शकतील. हे दोन्ही देश दर सहा महिन्यांनी एकमेकांना आपल्या अण्वस्त्र कार्यक्रमाची माहिती देतील, असे ठरले होते. यातला तिसरा आणि सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कोणाकडूनही चुकून एखादे अण्वस्त्र डागले गेले तर ते निष्प्रभ करायला हॉटलाईनचा मार्ग होता. पण हे तिहेरी नियंत्रण आता संपले. २०१० मध्ये झालेल्या कराराची मुदत दहा वर्षांची होती. तो करार २०२० मध्ये संपला. २०२१ मध्ये त्याला पुन्हा पाच वर्षांची मुदतवाढ दिली गेली. ती मुदतवाढ नुकतीच संपली आहे.

आज रशिया आणि युक्रेनदरम्यान युद्ध सुरू आहे. अमेरिका आणि इराण यांच्यादरम्यानही संघर्ष सुरू आहे. कोणत्या ठिकाणी कधी ठिणगी पडेल आणि केव्हा अण्वस्त्राचा वापर केला जाईल, हे सांगता येत नाही. यावर नियंत्रण ठेवणाऱ्या ऐतिहासिक कराराची मुदत संपुष्टात आल्यामुळे आणि त्याला कोणतीही मुदतवाढ देण्याची डोनाल्ड ट्रम्प यांची तयारी नसल्यामुळे आता आपण अतिशय धोकादायक परिस्थितीमध्ये प्रवेश करत आहोत. ऑगस्ट १९४५ मध्ये अमेरिकेने जपानमधल्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर दोन अणुबॉंब टाकले. त्यात लाखो लोक मृत्युमुखी पडले. हे भयावह चित्र संपूर्ण जगाने पाहिले आणि आज पुन्हा तीच परिस्थिती निर्माण झाली आहे. आता या कराराला आणखी मुदतवाढ देणे गरजेचे होते. पण त्यासंदर्भात कोणतीही चर्चा करण्यास डोनाल्ड ट्रम्प तयार नाहीत. पत्रकारांनी ट्रम्प यांना हा करार संपुष्टात येण्याबद्दल विचारले असता त्यांनी बेफिकिरीने 'हा करार संपतो आहे, तर संपू द्या', असे उत्तर दिले. दुसरीकडे, रशियाही माघार घेण्यास तयार नाही. युक्रेन युद्धात नाटोचा हस्तक्षेप होण्याची शक्यता पाहून व्लादिमिर पुतिन यांनी असा प्रत्यक्ष सहभाग घेतला गेल्यास आम्ही अण्वस्त्रांचा वापर करू, अशा धमक्या अनेक वेळा दिल्या आहेत. अर्थात कोणीही अण्वस्त्रांचा वापर केला तरी परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागणार आहेत. त्यात आता अण्वस्त्रांच्या संख्येबाबत, परिक्षणाबाबत आणि वापराबाबत कोणावरच निर्बंध राहिले नसल्यामुळे अण्वस्त्रनिर्मितीची जीवघेणी स्पर्धा सुरू होईल. आता पुन्हा १९६२ पूर्वीची परिस्थिती निर्माण झाल्यासारखे वाटत आहे. जग युद्धाच्या खाईत लोटले जात आहे. डोनाल्ड ट्रम्पसारख्या राष्ट्राध्यक्षाला लष्करी सामर्थ्याच्या बळावर सगळ्या गोष्टी हव्या आहेत. त्यांना ग्रीनलॅंड अवा आहे, जगातल्या सर्व खनिज तेलावर मालकी हक्क हवा आहे, बळाच्या जोरावर व्हेनेझुएला, इराणसारख्या देशांमध्ये सत्ताबदल हवा आहे, ते अनेक राष्ट्रांना धमकावत आहेत. अमेरिका आणि रशियादरम्यानच्या संघर्षामुळे जगातील मानवी अस्तित्व धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे या मुद्द्यावर सर्व आंतरराष्ट्रीय संघटना फक्त बघ्याची भूमिका घेत आहेत. युनायटेड नेशन्स, जी ७, जी २० आणि इतर प्रादेशिक संघटनांमध्ये या दोन देशांना रोखण्याची क्षमता राहिलेली नाही. या धोक्याची तीव्रता पाहता या कराराला पुन्हा मुदतवाढ मिळणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे यावेळी हा करार या दोन देशांदरम्यानच न होता चीनलाही बरोबर घ्यायला हवे. चीनकडेही ६०० अण्वस्त्रे आहेत, तो देश बेभान झाला आहे. आता एनपीटी, सीटीबीटी अशा कोणत्याही कराराचे महत्त्व राहिलेले नाही. अमेरिका कोणत्याही कराराला जुमानण्यास तयार नाही. यासंदर्भात जागतिक दबाव निर्माण न झाल्यास मोजक्याच देशांच्या अनियंत्रित वागण्यामुळे जग धोक्यात येऊ शकेल. जगाला तिसरे महायुद्ध परवडणारे नाही. तिसरे महायुद्ध झाले तर आपण हजारो वर्षे मागे जाऊ. याबाबत जगातील सर्व अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी एकत्र येऊन अण्वस्त्रनिर्मिती आणि वापरावर निर्बंध आणणारा एक समग्र करार करणे, हाच उपाय आहे. तसे पाऊल कधी आणि कसे उचलले जाते ते आता पहायचे.

# विध्वंस कयामतची निशाणी




**सलीमखान पठाण**
मोबा.९२२६४०८०८२

प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर (सल्ललल्ला ००७. हो अलैहे व सल्लम)यांनी दिलेल्या संदेशानुसार व कुरआन शरीफमध्ये अल्लाहतआलाने सांगितलेल्या निर्देशानुसार व्यक्तीचं या दुनियेतील वास्तव्य हेअल्पकालीन व तात्पुरते आहे.प्रत्येकाला मृत्यूला सामोरे जावे लागणार आहे.एक दिवस या जगाचा विनाश होणार असून मृत्यू पावलेल्या सर्वांना पुन्हा जागे केले जाणार आहे. तो दिवस कयामतचा दिवस आहे.या दिवशी प्रत्येकाला दुनियेमध्ये त्याने वास्तव्य काळात केलेल्या बऱ्यावाईट कार्याचा निकाल दिला जाईल.त्या निकालानुसार ज्याचे पुण्य जास्त असेल तो स्वर्गात (जन्नत) जाईल,ज्याचे पाप जास्त असतील तो नरकात (जहन्नुम) जाईल. तो दिवस लवकरच येणार आहे. म्हणून प्रत्येकाने या दुनियेमध्ये जीवन जगतांना आपल्याला आपल्या प्रत्येक कार्याचा हिशोब द्यावयाचा आहे ही जाणीव ठेवून वागावे.सतत चांगले कार्य करण्याचा प्रयत्न करावा.आपण काहीही केले तरी कोण पाहतोय ही भावना मनातून काढून टाकावी.एक अशी शक्ती ज्याने ही सृष्टी निर्माण केली,ती सर्व काही पाहत आहे.आपल्या दररोजच्या वर्तनाची नोंद ते सतत घेत असतात ही जाणीव मनात ठेवली तर माणसाकडून चुका घडू शकत नाही. जाणते-अजाणतेपणी आपण काही गोष्टी करत असतो. धार्मिक श्रद्धेपोटी वेगवेगळे सोपस्कार आपण करतो. त्याचबरोबर रात्रीच्या अंधारात, दिवसाच्या उजेडात, एकांतामध्ये नको त्या गोष्टी सुद्धा करीत असतो. आपल्याला वाटते कोणी पाहिले नाही,परंतु तो परमेश्वर सत्तर पडद्यामध्ये सुद्धा केलेले सर्व काही पाहत असतो.

विनाशकालीन जीवन रुपी दुनियेतआपल्या हातून चांगलं घडेल असेच आपण करावे. आपल्याला आपल्या प्रत्येक कारनाम्याचा हिशोब द्यावा लागणार आहे.त्यासाठी सदैव तयार रहावे.ज्याचा हिशोब त्यालाच दयावयाचा आहे.तेथे कुणी ही कुणाची मदत करू शकणार नाही याची जाण ठेवावी. रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर यावर्षी फळांची टंचाई असून फळांचे व्यापारी मनमानी पद्धतीने दर आकारित आहेत.सुकामेव्याचे दर सुद्धा गगनाला भिडले आहेत.

कृत्रिम टंचाई निर्माण करून अडचणीत सापडलेल्या लोकांना लुटले जात आहे. पण लक्षात ठेवा,या सर्व पापांची फळे तुम्हाला भोगावी लागणार आहेत. त्यासाठी तयार राहा. रमजान महिन्याच्या पवित्र पर्वातच इराण इसराइल अमेरिका यांच्या युद्ध सुरू आहे.याचा फटका अरब जगतातील अनेक देशांना सुद्धा बसला आहे.एकटा इराण अठरा देशांशी युद्ध लढत आहे.अमेरिकेने जगावर लाभलेले युद्ध आहे याची किंमत प्रत्येकाला चुकवावी लागणार आहे.मानवाने निर्माण केलेल्या विनाशकारी अस्त्रांचा वापर करून मानवी जात नष्ट करण्याचे पाप केले जात आहे.हा विधवंस जगाला कयामतच्या दिशेने घेऊन जात आहे.(क्रमशः)

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांची दिमाखदार उधळण

### 'श्री तिलोक जैन'चा वार्षिक उत्सव जल्लोषात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी येथील श्री तिलोक जैन इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या बहारदार सादरीकरणांनी जल्लोषात पार पडला. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाटिका, गायन आणि वादनाच्या आकर्षक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला.



श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, विश्वस्त डॉ. ललितजी गुगळे, सुरेश कुचेरिया, धरमचंद गुगळे, राजेंद्र मुथा, श्री तिलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी, उपप्राचार्य अशोक गर्जे, पर्यवेक्षक मिसाळ, भारत गाडेकर, श्री तिलोक जैन इंग्लिश मिडीयम विद्यालयाचे प्राचार्य विजय तागड यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या रंगतदार नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. गाण्याच्या तालावर अचूक हावभाव, एकसारखी हालचाल आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण पाहून उपस्थितांनी टाळ्यांचा वर्षाव केला. अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सादर केलेल्या नृत्यांनी वातावरण देशभक्तीच्या रंगात रंगून गेले.

या कार्यक्रमासाठी करण्यात आलेली भव्य मंचसजावट, आकर्षक प्रकाशयोजना आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे सोहळ्याची शोभा अधिकच वाढली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिलेले प्रशिक्षण आणि परिश्रम याचेही या कार्यक्रमातून प्रत्यंतर आले. पालकांनीही आपल्या मुलांचे सादरीकरण पाहून समाधान व्यक्त केले.

# 'भगवान बाबा'मध्ये अडकल्या ठेवी

## अनामत मिळण्यासाठी ठेवीदारांचे आमरण उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : श्री संत भगवान बाबा मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी लिमिटेडच्या पाथर्डी शाखेत ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकून पडल्याच्या निषेधार्थ ठेवीदारांनी गुरुवारी (दि. ५) सकाळपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. दीड ते दोन वर्षांपासून वारंवार पाठपुरावा करूनही ठेवी परत मिळत नसल्याने संतप्त ठेवीदारांनी हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून ठेवीदारांना न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

श्री संत भगवान बाबा मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या पाथर्डी शाखेत अनेक ठेवीदारांनी बचत व मुदत ठेव खात्यांद्वारे आपली कष्टाची कमाई जमा केली आहे. ग्रामीण भागातील शेतकरी,




व्यापारी तसेच सामान्य नागरिकांनी आपल्या विश्वासाने या संस्थेत पैसे गुंतवले होते. मात्र गेल्या दीड ते दोन वर्षांपासून ठेवीदारांना त्यांच्या खात्यातील रक्कम परत मिळत नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. वारंवार मागणी करूनही ठेवीदारांना पैसे परत दिले जात नसल्याने ठेवीदार आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करत आहेत.

ठेवीदारांच्या माहितीनुसार पाथर्डी शाखेत सुमारे नऊ कोटी रुपयांच्या ठेवी अडकून पडल्या आहेत. त्यापैकी सध्या सुमारे ४० ठेवीदारांच्या गटाचे अंदाजे साडेचार कोटी रुपये अडकले असून या ठेवीदारांनी आपली रक्कम परत मिळवण्यासाठी संघर्ष सुरू केला आहे. सुरुवातीला संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ठेवीदारांना लवकरच ठेवी परत देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर काही ठेवीदारांना धनादेश देण्यात आले; मात्र ते धनादेश बाउन्स झाल्याचे ठेवीदारांनी सांगितले.

संस्थेच्या व्हाईस चेअरमन यांनी संस्थेच्या मालकीची कोट्यवधी रुपयांची जागा ठेवीदारांच्या नावावर नोटरीद्वारे करण्याचे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने नोटरीची प्रक्रिया देखील करण्यात आली. मात्र नोटरीची मुदत संपूनही ती जागा ठेवीदारांच्या नावावर करण्यात आलेली नाही. त्यामुळे संस्थेच्या चेअरमन, व्हाईस चेअरमन तसेच संचालक मंडळाने दिलेल्या आश्वासनांचे उल्लंघन केल्याचा आरोप ठेवीदारांनी केला आहे.

## राज्याची 'विकासझेप'

काम करणारा माणूस ही त्यांची ओळख होती. त्यांनी दिलेली विकासाची दिशा आजही आपल्याला प्रेरणा देत आहे. त्यांना श्रद्धांजली म्हणून सर्व मान्यवरांशी चर्चा करून त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेसे भव्य स्मारक उभारण्यात येईल. तसेच त्यांच्या नावे गतिमान नागरी सेवा पुरस्कार देण्यात येईल असे मी जाहीर करतो. हा अर्थसंकल्प मी अजित पवारांना समर्पित करतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्याचीही घोषणा केली. सरकारने राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. यासाठी एक समिती गठीत करण्यात आली होती. त्यानुसार राज्यातील ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकित असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मी जाहीर करत आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अशीच सुरू राहणार आहे. या योजनेसाठी आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आली आहे. एकल महिलांच्या कल्याणसाठी लवकरच धोरण आणण्यात येईल. २५ लाख दीदींना लखपती करण्याचे उद्दिष्ट आहे.

मुख्यमंत्री तथा अर्थमंत्र्यांनी यावेळी राज्यात लवकरच ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार असल्याचीही घोषणा केली. ते म्हणाले, महायुती सरकार स्थापन झाल्यापासून आतापर्यंत १ लाख २० हजार कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यात आली आहे. त्यानंतर आता पुढील कालावधीत टप्प्याटप्प्याने एमपीएससी व इतर यंत्रणाच्या माध्यमातून आणखी ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील शहरांमध्ये ५ हजार ५८० कोटी रुपयांचा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. सांडपाणी प्रक्रिया पूनर्वापर करण्यासाठी हा निधी उपयोगात येईल. नवउद्योजकांना आर्थिक बळ देण्यासाठी मुख्यमंत्री उद्योजकता महाफंड स्थापन करणार. निवडक स्टार्टअप्सना थेट मदत केली जाणार आहे. सर्वोत्तम स्टार्टअप्सची निवड करून त्यांचे प्रकल्प शासकीय विभागात राबवण्यासाठी २५ लाखांपर्यंतची कामे निविदेशिवाय थेट देणार. राज्यात बांबू उद्योग धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्यासाठी ५० हजार कोटींपेक्षा जास्तीची गुंतवणूक आकर्षित करण्यात येणार आहे. ५ लक्ष प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट आहे. राज्यात ३७ लाख लखपती दीदी झाल्या आहेत. या प्रकरणी आणखी २५ लाख महिलांना लखपती दीदी करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. उमेद मॉलमधून विक्री करण्यासाठी खास धोरण राबवण्यात येणार आहे. राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, सरकार १ लाख २५ उद्योजक घडवण्यासाठी ५० हजार स्टार्टअप्सला बळ देणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री फंड देण्यात येणार आहे. खास स्टार्टअप्सला कर्ज सुविधेसह निविदा प्रक्रियेत खास सवलत देण्यात येणार आहे. या प्रकरणी भारत इनोव्हेशन स्टार्टअप योजना राबवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, कर्करोग, मधुमेह व हृदयविकार यासारख्या आजारांचे लवकर निदान करण्यासाठी आशियाई विकास बॅंकेच्या मदतीने दरवर्षी तपासणी मोहीम राबवण्यासाठी ४,५०० कोटी रुपयांची प्रगती योजना प्रस्तावित आहे. राज्यातील २९ महापालिका, २४७ नगरपरिषदा, १४७ नगरपंचायतींमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व आरोग्य विभागाच्या सर्व गुणवत्तापूर्ण सुविधा देण्यासाठी समन्वय साधणे व कामकाजाचे संनियंत्रण करण्यासाठी शहरी आरोग्य आयुक्तालयाची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यात डीजिटल सार्वजनिक आरोग्य परिसंस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान राबवण्यात येईल. यामुळे रिअलटाईम डॅशबोर्डच्या मदतीने प्रभावी निर्णय प्रक्रिया व संनियंत्रण करणे शक्य होईल. मुख्यमंत्र्यांनी यावेळी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याचीही घोषणा केली. हवामानाचा अंदाज व्यक्त करणाऱ्या अनेक संस्थांनी २०२६ मध्ये अलनिनोमुळे मान्सूनवर परिणाम होऊन दृष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्ती केली आहे. त्या दृष्टिकोनातून पिण्याचे पाणी राखून ठेवणे, जलयुक्त शिवार व जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाण्याच्या सवर्धनासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत, असे ते म्हणाले. राज्याचे नवे गुंतवणूक आणि सेवा धोरण जाहीर त्यात परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र वन, प्रत्येक जिल्ह्यात एमएसएमई केंद्र, उद्योजकता वाढीसाठी प्रत्येक जिल्ह्यात सेवाक्षेत्र आयुक्तालय, गडचिरोली जिल्हा ७० हजारोंना अधिक रोजगार, गडचिरोली स्टील हब म्हणून उदयास दोन लाख कोटींची गुंतवणूक होणार, रोजगार निर्मितीसाठी जागतिक क्षमता केंद्र, स्टार्टअप प्रोत्साहन करण्यासाठी विशेष योजना, मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी सुरू, जागतिक क्षमता केंद्राची सर्वाधिक पसंती पुण्याला,मुंबई दुबई सिंगापूर मध्ये पर्यटन गुंतवणूक कक्ष सुरू करणार, वासोटा किल्ल्यावर जाण्यासाठी रोपव, तिसरी चित्रनगरी नागपूर जिल्ह्यात रामटेकमध्ये, पाच ज्योतिर्लिंगांचा विकास आराखड्यासाठी तरतूद, महानुभाव पंथाच्या महत्त्वाच्या ठिकाणांचा विकास, १० हुन सक्षम विकास प्राधिकरण स्थापन करणार, अटल सेतू परिसरात तिसरी मुंबई विकसित करणार, २०३० पर्यंत एम एम आर ची अर्थव्यवस्था ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेणार, एमएमआरमध्ये बेकायदा झोपडपट्ट्यांना आळा घालण्याचे नव धोरण, मुंबई दुसरी भूमिगत मेट्रो सुरू करणार आहेत.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी मुख्यमंत्री बळीराजा योजना २०२७ मध्येही सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले. प्रस्तुत योजनेअंतर्गत १०० टक्के वीज बिल सवलत देण्यात येत आहे. याशिवाय मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेंतर्गत ६ लाखांहून अधिक पंप देण्यात आल्याचे ते म्हणाले. सौर कृषिपंप योजनेची गिनिज बुक मध्ये नोंद करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी राज्यातील १ हजार गावे कॉंक्रिट रस्त्याने जोडणार असल्याचीही घोषणा केली. ते म्हणाले, राज्यातील १ हजार गावांना कॉंक्रिट रस्त्याने जोडण्यात येतील. दक्षिण मुंबईला समृद्धी महामार्गासोबत जोडण्यासाठी २०२८ पर्यंत काम करण्याचे प्रयत्न आहेत. वर्सोवा भाईंदर किनारी मार्ग डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पनवेल ते कर्जत अंतिम टप्प्यात, लवकरच वाहतुकीसाठी खुला करणार आहे. मुख्यमंत्र्यांनी यावेळई नागपूरच्या रामटेकमध्ये तिसरी चित्रनगरी उभारण्याचीही घोषणा केली. ते म्हणाले, सरकार मुंबई, दुबई, सिंगापूरमध्ये पर्यटन गुंतवणूक कक्ष सुरू करणार आहे. ५० पर्यटनस्थळांवर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत. याशिवाय नागपूरच्या रामटेकमध्ये तिसरी चित्रनगरी उभारली जाणार आहे.

महाराष्ट्र अमृतकाल योजनेत २०४७ पर्यंत टप्प्या टप्प्याने रस्त्यांचा विकास केला जाणार. शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित सरेखनाला मान्यता देण्यात आली आहे. वडाळा ते गेट वे ऑफ इंडिया मुंबई मेट्रो मार्गिका ११ हा २३,४८७ टी रुपये किंमतीचा भूमिगत प्रकल्प हाती. या प्रकल्पाचा विस्तार धारावी पुनर्वसन प्रकल्पासून वांद्रे टर्मिनर्सपर्यंत करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## आ. पवारांनी घेतली उपमुख्यमंत्र्यांची भेट

म्हणून अजितदादांच्या बाबतीमध्येच ते विमान वापरले गेले मग अपघात झाला हे काही लोकांना माहिती असल्याने त्यांच्या मनात असेल की आता काही होणार नाही, असे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

आ. पवार म्हणाले की, व्हिएसआर कंपनीची सर्व विमाने ग्राऊंड केली गेली पाहिजे ही जय पवार आणि माझी सुद्धा मागणी आहे. अजित पवारांच्या बाबतीमध्ये जे घडले ते दुसऱ्या नेत्यांच्या बाबतीत घडू नये यासाठी आम्ही ती भूमिका मांडतो आहोत. व्हिएसआरच्या विरोधात आम्ही लढतो आहोत आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे ऑफीसमधील अधिकारी त्यांना त्यांच कंपनीच्या विमानातून प्रवास करायला लावत आहेत.

आ. पवार म्हणाले की, अजित पवार यांच्या विमान अपघाताबद्दल तपासाला जेवढा उशिर केला जाईल तेवढे कागदपत्रे रंगवले जातील. अजितदादासोबत सत्तेत असणाऱ्या सहकाऱ्यांनी याचा तपास लवकर व्हावा, योग्य दिशेने व्हावा, गुन्हा दाखल व्हावा यासाठी प्रयत्न केले पाहिजे, आता दीड महिना होईल पण व्ही. के. सिंग किंवा त्यांच्या कंपनीकडे असलेले कागदपत्रे अजूनही ताब्यात घेण्यात आलेली नाही. हा तपास मॅनेज करत काही लोकांना वाचवले जात आहे. व्ही. के. सिंगला वाचवले जात आहे. २०२३ मध्ये एकनाथ शिंदेंचे विमान मुंबईला उडाले तिथेही व्ही.के.सिंगचे होते. ते विमान इराणच्या सरकारकडून पाडण्यात येऊ शकत होते. अजितदादांचा अपघात त्यांच्याच विमानात झाला तरी वाचवले जात असेल तर त्यांच्यामागे मोठा हात आहे.

रोहित पवार म्हणाले की, अजित पवारांच्या अपघातामागे काहीतरी षड्यंत्र आहे असे सांगूनही योग्य दृष्टीने तपास करण्यात आला नाही. सीबीआयकडे प्रस्ताव पाठवला असे म्हणतात. सुशांतसिंहच्या प्रकरणी बिहार सरकारने प्रस्ताव पाठवला तो सीबीआयने दोन दिवसात स्वीकारला पण महाराष्ट्रातील नेत्याचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा प्रस्तावा पाठवून २२ दिवस झाले पण तो स्वीकारला जात का नाही? असा प्रश्न लोकांना पडला आहे.

रोहित पवार म्हणाले की, काल व्हीसीआर कंपनीचा मालक सीआयडीला भेटण्यासाठी आला होता. पोलिसाला भेटण्यासाठी आलेल्या व्यक्तीच्या आजूबाजूला बंदुकधारी सुरक्षारक्षक होते. ११ वाजता ते सीआयडी ऑफीसला आले. त्यांना नाष्टा ते जेवन आणि क्रिकेट मॅचसुद्धा दाखवण्यात आली. व्ही.के सिंगला पोलिसांनी काळ्या काचा असलेल्या गाडीत बाहेर काढले एवढी व्हीआयपी ट्रीटमेंट एखाद्याला देत असाल तर ते दु:ख देणारे आहे. मी चार वाजता सीआयडीला जाणार आहे.

## राहुरीसह बारामतीत लवकरच पोटनिवडणूक?

या मोठ्या निवडणूक प्रक्रियेसोबतच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघातील पोटनिवडणुका जाहीर होऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

बारामती मतदारसंघाबाबत बोलायचे झाल्यास, अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याच्या राजकारणात मोठे बदल घडले. त्यांच्या पश्चात सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देत राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. मात्र, राज्यघटनेनुसार उपमुख्यमंत्री म्हणून पदावर राहण्यासाठी सहा महिन्यांच्या आत त्यांना विधानसभा किंवा विधानपरिषद यापैकी एका सभागृहाचे सदस्य होणे आवश्यक आहे. त्यामुळे बारामतीच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार उमेदवार म्हणून मैदानात उतरणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. या घडामोडींमुळे बारामती मतदारसंघ पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेची जागा रिक्त केल्यानंतर त्या जागेवर पार्थ पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पवार कुटुंबातील राजकीय घडामोडींनीही या निवडणुकीकडे विशेष लक्ष वेधले आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची कोअर कमिटीची बैठक पार पडली होती. या बैठकीत बारामती पोटनिवडणुकीसाठी सुनेत्रा पवार यांचे नाव उमेदवार म्हणून निश्चित करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून बारामतीत सुनेत्रा पवार यांची उमेदवारी जवळपास ठरल्याचे मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर आता विरोधी पक्षांकडून कोण उमेदवार उभा राहणार, याबाबतही उत्सुकता वाढली आहे.

दरम्यान, राहुरी विधानसभा मतदारसंघातही राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भारतीय जनता पक्षाचे आमदार शिवाजी भानुदास कर्डिले यांचे गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात निधन झाले होते. त्यानंतर राहुरीची जागा रिक्त असून तेव्हापासून या मतदारसंघात पोटनिवडणुकीची चर्चा सुरू आहे. आता निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता निर्माण झाल्याने भारतीय जनता पक्षाकडून या जागेसाठी कोणाला उमेदवारी दिली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक पातळीवर अनेक इच्छुकांची नावे पुढे येत असून पक्ष नेतृत्व अंतिम निर्णय कधी घेते, याची राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे.

## कोपरगावला अर्थसंकल्पात २५ कोटींची भेट

करण्यासाठी ८० लाख रुपये, धारणगांव कुंभारी माहेगांव देशमुख कोळपेवाडी ते रामा-७ (प्रजिमा-८५) किमी ०/००० ते ५/००० (मौजे कुंभारी ते कोळपेवाडी खराब रस्त्याची लांबी) मध्ये रस्ताची सुधारणा करण्यासाठी ४ कोटी २० लाख रुपयांचा, जेऊर कुंभारी सडे शिंगवे पुणतांबा रस्ता (रामा ३६) किमी १६/४०० मध्ये जोड रस्त्यासह मोठ्या पुलाचे (कातनाला) बांधकाम करणे यासाठी ३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद २०२६-२७ च्या अर्थ संकल्पात करण्यात आली आहे.

आ. आशुतोष काळे यांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, एकनाथ शिंदे यांचे आभार व्यक्त करताना सांगितले की, या निर्णयामुळे मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले रस्ते आणि पुलांचे प्रश्न आता मार्गी लागणार आहे. कोपरगाव मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणे हे माझे प्रमुख ध्येय आहे. निधीअभावी कोणतीही विकासकामे रखडू नयेत यासाठी मी सदैव प्रयत्नशील असतो. या २५ कोटींच्या निधीमुळे मतदारसंघातील अंतर्गत रस्त्यांचे जाळे अधिक मजबूत होईल आणि नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे.

# अडीच लाख ग्राहक झाले 'डिजिटल'

## सकाळी ९ ते ५ या वेळेत वीज वापरणाऱ्यास सवलत



**कोटींचा लाभ**

विजेचा वापर कोणत्या वेळेला झाला त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला टाइम ऑफ डे (टीओडी) सवलत म्हणतात. स्मार्ट मीटरमध्ये अशा प्रकारे वेळेनुसार वीजवापर मोजण्याची सुविधा आहे व ग्राहकांनाही त्यांच्या मोबाइल फोनमधील ॲपमध्ये दर तासाला आपल्या घरात अथवा कार्यालयात किती वीज वापर होत आहे, हे समजते. स्मार्ट मीटरमुळे घरगुती ग्राहकांनाही टीओडी सवलत सुरू केली आहे. राज्यातील ५४ लाख ४२ हजार घरगुती ग्राहकांना जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या सात महिन्यांच्या मासिक वीजबिलामध्ये तब्बल ५१ कोटी ४२ लाख रुपयांचा लाभ झाला आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील सुमारे अडीच लाख ग्राहकांच्या घरांवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहे. महावितरणच्या या ग्राहकांना आता सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वीजवापरावर ८० पैसे प्रतियुनिट सवलत मिळत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख ४५ हजार टीओडी मीटर बसवण्यात आले आहेत.

जिल्ह्यात कृषी वगळता घरगुती, व्यापारी, औद्योगिक अशा एकूण साडेसहा लाख ग्राहकांना हे स्मार्ट मीटर बसवले जाणार आहेत. गेल्या दोन वर्षात यातील २ लाख ४५ हजार ग्राहकांना हे मीटर बसवण्यात आले आहेत. अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाइलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत.

स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रतियुनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. दरम्यान, जिल्ह्यात एकूण साडेसहा लाख ग्राहकांना स्मार्ट मीटर बसवले जाणार आहेत. यासाठी महावितरणने ठेकेदाराची नेमणूक केली आहे. गेल्या दोन वर्षांपासून ही मोहीम सुरू आहे; परंतु अद्याप केवळ ३८ टक्के ग्राहकांनाच स्मार्ट मीटर बसवण्यात आलेले आहेत. उर्वरित चार लाख ग्राहकांना स्मार्ट मीटर बसवण्यास महावितरणला अजून किती कालावधी लागणार, याकडे ग्राहकांचे लक्ष असेल. अचूक बिल, ग्राहकाला दर तासाला मोबाइलवर वीजवापर समजतो, दिवसाच्या वीजवापरसाठी वीजदरात टीओडी सवलत, ग्राहकाला वीजवापरावर नियंत्रण ठेवणे आणि वापराचे नियोजन करण्याची सुविधा, महिन्याचे रिडिंग आपोआप घेतले जाते.

# घारगावला एसटी बस थांबेना

## विद्यार्थी, महिला प्रवाशांमधून आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : तालुक्याच्या पठार भागातील घारगाव येथे परिवहन महामंडळाच्या बसेस थांबत नसल्याने प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. एसटी महामंडळाच्या कारभाराविरोधात घारगावकरांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

नाशिक-पुणे महामार्गावरील पठार भागातील घारगाव दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचे गाव आहे. या ठीकाणी मोठी बाजारपेठ असून परिसरातील अनेक गावांतील नागरिकांची ये-जा येथे सुरु असते. दररोज मोठ्या संख्येने नोकरदार, व्यापारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी संगमनेर, आळेफाटा येथे प्रवास करत असतात. शासनाने महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रवासात सवलती जाहीर केल्या असल्या, तरी घारगाव येथे एसटी बसेसच थांबत नसल्याने या सवलती केवळ कागदावरच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अनेक प्रवासी बसला हात दाखवून थांबण्याची विनंती करतात तब्बल दोन-दोन तास बसची वाट पाहूनही बस न थांबल्याने नाईलाजाने खाजगी वाहनांचा आधार घेत आहेत.

यामुळे आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागत आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा बोटा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य जनार्दन आहेर, कृषी उत्पन्न बाजारा समितीचे माजी संचालक शांतारामा वाकळे, रमेश आहेर, ॲड. अरुण आहेर, बाळासाहेब आहेर, माजी उपसरपंच संदिप आहेर, तुळशीनाथ भोर, रौफ शेख, हरीदास आहेर, विकास घाटकर, महेश घाटकर आदिंनी दिला आहे.

# काळेश्वरच्या मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव** : शेवगाव -नेवासा राजमार्गावरील भातकुडगाव फाटा चौफुल्या पासून हाकेच्या अंतरावर हाकेच्या असलेल्या श्री क्षेत्र गुंफा येथील स्वयंभू काळेश्वर देवस्थान मंदिरात भगवान विष्णू व श्री गणेशाच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.



पौराहीत्य मयूर मुळे, योगेश मुळे,चैतन्य मुळे व सार्थक मुळे यांनी केले. तर महापूजेचा मान अमोल भालेराव, निलेश भालेराव, महेश महाराज काळे, अशोक नलगे देविदास खेडेकर यांना सपत्नीक मिळाला. शास्त्रेयुक्त यथोचित महापूजा संपन्न झाली. त्यानंतर देवतांची स्थापना करण्यात आली.

श्री स्वयंभू काळेश्वर देवस्थान विस्थापनानंतर गुंफा या ठिकाणी स्थापना झाल्यानंतर दि. ९ मार्च २०२६ रोजी २९ वर्ष पूर्ण होत आहे. या निमित्ताने प्रतिवर्षी प्रमाणे लघु रुद्र महापूजा व महाभिषेक संपन्न होणार आहे. मोठ्या उत्साही भक्तिमय वातावरणात वर्धापन साजरा होणार आहे. संपूर्ण मंदिर आकर्षक फुलांनी सजवून, परिसरात रांगोळी काढण्यात येणार आहे. पूजेनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले.

दिवसभर चाललेल्या मंत्र जयघोषाने व भगवान काळेश्वराच्या जय जयकाराणे मंदिर परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते. यावेळी देवस्थानचे विश्वस्त डॉ. हरीकिशन सोमाणी यांच्या वतीने महाप्रसादाची पंगत देण्यात आली.यावेळी लहानु महाराज कराळे, देवस्थानचे प्रमुख माजी सरपंच शंकरराव नारळकर, सुनील भालेराव, दत्तादेवा गोसावी, बाळासाहेब काळे, आर आर माने, शेषराव काळे,भास्कर चोपडे, परसराम खंडागळे, पत्रकार शहाराम आगळे यांच्यासह नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# निधन वार्ता

## प्रा. अशोकराव कचरे



**पाथर्डी** : तालुक्यातील प्रगत शील शेतकरी आणि सेवानिवृत्त प्रा. अशोकराव कचरे यांचे ज्येष्ठ बंधू बाबासाहेब सजनरव कचरे (वय ६७) यांचे निधन झाले. त्यांचे पशच्यात दोन मुले, दोन मुली, पुतणे, जावई एक भाऊ असा परिवार आहे. श्रीगोंदा येथील डॉ. सुप्रिया झिटे यांचे चुलते तर प्रा. रत्नाकर झीटे यांचे चुलत व्याही होते. त्यांचे निधनाने परिसरात हळ हळ व्यक्त होत आहे.

## बाळासाहेब अंत्रे



**सोनगाव** : येथील सोनगाव ग्रामपंचायत माजी सदस्य बाळासाहेब नामदेव अंत्रे (वय ५७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी,बहिणी, भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.शांत, मनमिळावू व कुटुंबवत्सल स्वभावामुळे बाळासाहेब अंत्रे यांना समाजात मानाचे स्थान होते. सामाजिक क्षेत्रात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पार्थिवावर सोनगाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## गंगाधर पवार




**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव तसेच वांगी या ठिकाणी वास्तव्यास असलेले गंगाधर बाबासाहेब पवार (वय ५८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, दोन बंधू, तीन बहिण, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल पवार, केतन पवार यांचे ते वडील तर वसंत पवार, अशोक पवार, राजेंद्र पवार, रघुनाथ व रामभाऊ पवार, माजी सरपंच रविंद्र पवार यांचे ते बंधु होत.

## बिपीन गायकवाड



**कोपरगाव** : कोपरगाव तालुका मराठी पत्रकार संघाचे सदस्य बिपीन चंद्रभान गायकवाड (वय ५२) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ, दोन बहिणी, पत्नी, दोन मुली, मुलगा, असा परिवार आहे. ते बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक होते.

## सुनील साळुंके



**श्रीरामपूर** : येथील पल्लवी केमिकल्सचे मालक व नॉर्दन ब्रँच हरिनाम सप्ताह कमिटीचे अध्यक्ष सुनिल ज्ञानदेव साळुंके (वय-६०) यांचे अहिल्यानगर येथील नोबेल हॉस्पिटल येथे अल्पश: आजाराने निधन झाले.ते किशोर साळुंके यांचे थोरले बंधू होत. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, बहीण, मुलगी, पुतणे, जावई असा परिवार आहे.

# शिवरायांच्या व्याख्यानमालेस उत्स्फूर्त प्रतिसाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या बिजोत्सवाचे औचित्य साधून जामखेड येथील श्री विठ्ठल मंदिरात शुक्रवार दि. २७ फब्रुवारी ते शुक्रवार दि. ६ मार्च या कालावधीत सोहळा भक्ती आणि शक्तीचा अर्थात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाचे हे ३९ वे वर्ष होते.

या सप्ताहात काकडा भजन, श्री.विठ्ठल रूक्मिणी महापूजा, जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या गाथेचे सामूहिक पारायण, गाथा भजन, प्रवचन हभप विजय महाराज बागडे सर व पंढरीनाथ राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली केले. या कार्यक्रमात निष्ठावंत ज्ञानी वारकरी महापुरुषांचे कीर्तन या दैनंदिन कार्यक्रमांसोबत यावर्षी 'शिवरायांचे आठवावे रूप' अर्थात 'जिजामातेने शिवबांना दिलेले संस्कार' या विषयावर ४ दिवसीय सांगितिक व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.

संत साहित्याचे अभ्यासक व सध्या बांधखडक शाळेत कार्यरत असलेले आदर्श शिक्षक मनोहर इनामदार, सेवानिवृत्त अधिक्षक डाकघर अहिल्यानगर सदानंद होशिंग आणि ल.ना. होशिंग माध्य. विद्यालयाचे माजी प्राचार्य श्रीकांत होशिंग यांनी आपल्या ओघवत्या व अभ्यासपूर्ण भाषेत शिवचरित्राचे गान केले.

ही व्याख्यानमाला म्हणजे जामखेडच्या धार्मिक व सांस्कृतिक इतिहासातील एक प्रेरणादायी असा सांगितिक कार्यक्रम ठरला असून याचे सादरीकरण युवकांना प्रेरीत व प्रोत्साहित करण्यासाठी गावागावात व्हायला हवे, असे गौरवोद्गार मधुकर राळेभात यांनी व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी बोलताना काढले.

# धांदरफळ खुर्दला महाराजस्व अभियान शिबिर

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील धांदरफळ खुर्द येथील बिरोबा मंदिर परिसरामध्ये रविवार दिनांक ७ मार्च रोजी महसूल विभागाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत विविध दाखल्यांचे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिरामध्ये धांदरफळ बुद्रुक, धांदरफळ खुर्द, गोडसेवाडी, नांदुरी दुमाला, मिर्झापूर, निमगाव बुद्रुक, निमगाव खुर्द, पेमगिरी, सांगवी, कौठे धांदरफळ, सावरचोळ, धुपे, मेंगाळवाडी व शिरसगाव या गावांतील नागरिकांना विविध महसुली सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या अभियान शिबिरात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरी असलेले ७/१२ व ८-अ उतारे वाटप करण्यात येणार आहे.



तसेच उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र यांसह विविध दाखले देण्यात येणार आहेत. या शिवाय अकृषिक परवानगी व तरतुदींबाबत मार्गदर्शन, नवीन व्यवस्थेनुसार 'सनद' प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शालेय दाखले यांचाही समावेश आहे.

तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनासंबंधी प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी तसेच भूसंपादन अन अकृषिक परवानगी संदर्भातील 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्याचे कामही यावेळी करण्यात येणार आहे.

# माळीझाप येथून पालखीचे झाले प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : शहर नगरपंचायत हद्दीतील माळीझाप येथून श्रीक्षेत्र चैतन्य कानिफनाथ महाराज, मढी (ता. पाथर्डी) येथे पदयात्रा पालखी व काठीचे धुलीवंदनाच्या दिवशी माळीझाप अकोले येथून प्रस्थान झाले. रंगपंचमीस चैतन्य कानिफनाथ महाराज, मढी येथील संजीवन समाधी सोहळ्याची सुरूवात होत आहे. या सोहळ्यास माळीझाप येथून पारंपरिक पद्धतीतून पालखी व काठी पदयात्रा दरवर्षीच नेण्याचा मान आहे. माळीझाप येथून अनेक वर्षांपासून ही अखंड परंपरा सुरू आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे होळीच्या दिवशी सकाळी काठीची मिरवणूक काढण्यात आली.



सायंकाळी सार्वजनिक होळी पेटवल्यानंतर पुन्हा काठी डफ, ढोल, ताशाच्या गजरात माळीझाप येथील संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणात दुमदुमून गेला. धुलीवंदनाच्या दिवशी सकाळीच जेष्ठ नागरिक, महिला व पुरुषांच्या हस्ते पालखी रथासह काठीचे पूजन पूजन करण्यात आल, अशी माहिती मच्छिंद्र मंडलिक, प्रमोद मंडलिक यांनी दिली. मढी यात्रेत माळीझाप येथील पारंपारिक डफ काठीला विशेष धार्मिक मान असतो.

रंगपंचमीच्या दिवशी या काठीचे आगमन चैतन्य कानिफनाथ महाराज, मढी (ता. पाथर्डी) येथे होईल. यात्रेत हा भाग महत्त्वपूर्ण तसेच घार्मिक सोहळा मानला जातो. ही पदयात्रा श्रद्धा धार्मिक परंपरेतील अभिमानास्पद विशेष भाग म्हणून माळीझाप मधील श्रद्धाळू नागरिक मानतात. पदयात्रेचा मार्ग अकोले येथून पुढे संगमनेर, लोणी, कोल्हार, टाकळीमिया, आरडगाव, शनिशिंगणापूर, घोडेगाव, मीरी मार्गे मढी असा राहील. रंगपंचमीच्या आदल्याच दिवशी तिसगाव येथून मढी येथे हा पालखी सोहळा पोहोचेल.

# गोदड महाराजांच्या पालखीचे पैठणकडे प्रस्थान

## भव्य रथ भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू



*''कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराज हे देशातील महान संत होऊन गेले. नाथ षष्ठीला त्यांची पालखी दरवर्षी पैठणकडे जाण्याची मोठी परंपरा आहे. वडील हनुमंतराव तनपुरे यांच्या स्मरणार्थ महाराजांसाठी रथ अर्पण करण्याची संकल्पना आई व कुटुंबीयांनी मांडली आणि त्यानुसार हा अत्यंत सुंदर रथ महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात आला.''*

**महेश तनपुरे, सामाजिक कार्यकर्ते.**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : नाथ षष्ठीच्या निमित्ताने गावोगावच्या पालख्या व दिंड्या टाळमृदंगाच्या निनादात, भगव्या पताका खांद्यावर घेऊन पैठणकडे प्रस्थान करत आहेत. या भक्तिरसपूर्ण वातावरणात कर्जत येथील ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराज यांच्या पालखी सोहळ्याने विशेष लक्ष वेधून घेतले आहे. संत सद्गुरु गोदड महाराज यांच्या जन्मस्थळ असलेल्या पाटील गल्ली येथून 'गोदडनाथ एकनाथाचा जयघोष' करीत वारकरी पैठणकडे निघाले असून, गावोगावी या पालखी सोहळ्याचे भक्तिभावाने स्वागत केले जात आहे.

या सोहळ्यातील भव्य व पवित्र रथ हा भाविकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. या रथाचे वैशिष्ट्य म्हणजेतो अयोध्येतील श्रीराम मंदिर उभारणीसाठी वापरण्यात आलेल्या लाकडापासून साकारण्यात आला आहे.

अत्यंत देखणे कोरीवकाम, सुबक सजावट आणि पारंपरिक कलाकुसर यामुळे रथाचे सौंदर्य अधिकच खुलून आले आहे. रथामध्ये संत सद्गुरु गोदड महाराज यांची सुंदर मूर्ती पालखीमध्ये विराजमान असून, भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शन घेत आहेत. कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते महेश तनपुरे यांनी वडील हनुमंतराव तनपुरे यांच्या स्मरणार्थ हा भव्य रथ संत सद्गुरु गोदड महाराज यांच्या चरणी अर्पण केला आहे. पालखीचा मुक्काम ज्या ज्या ठिकाणी होत आहे, त्या ठिकाणी या पवित्र रथासोबत स्थानिक नागरिक व वारकरी आवर्जून फोटोसेशन करताना दिसून येत असून, या स्मृती चिरकाल जपण्याचा भाव सर्वत्र जाणवतो आहे.

# दहशत घालणाऱ्यावर धडक कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील फेज १ व फेज २ औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक प्रकारची दहशत माजवणारा व स्वतःला किंग गौरव म्हणून दहशत पसरवणाऱ्या आरोपीस सुपा पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली एमपीडीएची कारवाई करण्यात आली आहे. गौरव हरिभाऊ घायाळ राहणार जिल्हा अहिल्यानगर या आरोपींनी पारनेर तालुक्यातील सुपा औद्योगिक वसाहत व परिसरात मोठ्या प्रमाणात दहशत मागण्याचा प्रकार केला पोलिसांनी अनेकवेळा त्याला समजून सांगण्याचा प्रयत्न केला. तरी या आरोपीने दहशत पसरवण्याचा प्रकार चालूच ठेवला. त्यावर आत्तापर्यंत दहा प्रकारचे गुन्हे दाखल झाले सुपा आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्याच्य मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर येथून जिल्हा नाशिक येथे कारागृहात स्थानबद्ध केले आहे. एमपीडीए या कारवाई अंतर्गत एक वर्षासाठी कारागरात पाठवले आहे. हा आरोपी किंग गौरव स्वतःच्या नावाचा दहशत म्हणून परिसरात प्रसिद्ध झाला होता. त्यामुळे पोलिसांनी त्याला एक वर्षाकरिता एमपीडीए अंतर्गत कारवाई केली आहे.

*पारनेर तालुक्यात सुपा परिसरातील औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक वर्षापासून वेगवेगळे आरोपी दहशत माजवत आहे. त्यामुळे पोलिसांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याचे परिसरातून बोलले जात आहे. व पोलिस अधिकारी ज्योती गडकरी यांचे ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. अजून या परिसरात तीन चार आरोपीची दहशत आहे. व त्यांच्यावरही गुन्ह्यांची संख्या वाढली तर अशा आरोपीवर एमपीडीए कायदा अंतर्गत कारवाई करणार आहे.*

**ज्योती गडकरी, पोलिस निरीक्षक.**

# संगमनेरात शिवरायांचे स्मारक उभारणार

## आ. सत्यजीत तांबे; नगरपालिकेच्या मत नोंदणी अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर हायटेक बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक व्हावे ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांची इच्छा आहे. याकरीता त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. २०१८ मध्ये नगरपालिकेने याबाबत प्रथम प्रस्ताव केला. जे आता स्मारकाची मागणी करतात ते त्यावेळी कुठेच नव्हते. या स्मारकासाठी शासनाकडे निधीची मागणी आहेच. अन्यथा शासनाच्या मदतीशिवाय लोकवर्गणी, नगरपालिका, आमदार निधी, जिल्हा विकास नियोजन या माध्यमातून संगमनेर बसस्थानकासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारणार असल्याचे आ. सत्यजीत तांबे यांनी जाहीर केले आहे.



संगमनेर बसस्थानक येथे संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने कसे असावे छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक याबाबत नागरिकांची मत नोंदणी शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, संदीप साळुंखे, सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा, नगरसेवक विश्वासराव मुर्तडक, सौरभ कासार, भारत बोराडे, नितीन अभंग, सीमा खटाटे, दिलीपराव पुंड, अर्चना दिघे, शोभाताई पवार, प्राची काशीद, किशोर पवार, डॉ. अनुराधा सातपुते, वनिता गाडे, गजेंद्र अभंग, दिपाली पांचारीया, गणेश गुंजाळ, अमजद पठाण, विजया गुंजाळ, अमर कतारी, सरोजना पगडाल, किशोर टोकसे, प्रियांका शहा, शैलेश कलंत्री, नंदा गरुडकर, मुजीब खान पठाण, डॉ. दानिश खान, शिवजयंती उत्सव समितीचे सतीश आहेर, संजय क्षत्रीय यांच्यासह संगमनेरातील विविध पक्षांचे व विविध सेवाभावी संघटनांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेरमधील हायटेक बसस्थानकासमोर मध्यवर्ती ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक व्हावे यासाठी मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सर्वप्रथम पाठपुरावा केला. तत्कालीन नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात २०१८ मध्ये नगरपरिषदेने याबाबत पाठपुरावा केला. जे आता स्मारकाची मागणी करता ते त्या वेळेस कुठेच नव्हते. २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी या कामाला गती दिली.

### मत नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली बस स्थानकासमोर अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, भव्य उभे महाराजांचे स्मारक आणि सिंहासनाधीश्वर महाराजांचे पूर्णाकृती स्मारक असे तीन पर्याय देण्यात आले असून सर्व नागरिकांनी आपले मत नोंदवा. ही नोंदणी तीन दिवस सुरू राहणार असून सर्वांनी आपले मत नोंदवावे. आपल्या सगळ्यांच्या मताचा आदर करून येत्या काळात भव्य स्मारक उभारण्यात येईल, असे आवाहन आ. सत्यजित तांबे यांनी केले असून पहिल्या दिवशी ६११३ नागरिकांनी मत नोंदणी केली आहे.

# रोहित कालेंना युवा उद्योजक पुरस्कार प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चांदेकसारे** : शिर्डी येथे परमपूज्य गणीनी भारत गौरव आर्यिका रत्न माताजी यांच्या अवतरण दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात कोपरगाव येथील युवा उद्योजक रोहित काले यांना जैन समाजाच्या वतीने युवा उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जैन समाजातील प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते शिखरचंदजी कासलीवाल यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. रोहित काले यांच्या कालांश राजगिरा लाडू व चिक्की या उद्योगाद्वारे महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देत महिला बचत गटांना प्रोत्साहन देत असल्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमास महाराष्ट्रातील प्रसिद्ध उद्योजक कैलासचंद भागचंद ठोळे, सतीश गंगवाल, किशोर गंगवाल, शितल पाटणी, कोपरगाव, शिर्डी, श्रीरामपूर, संभाजीनगर, मालेगाव, लासलगाव, हैदराबाद, इंदूर व नाशिक येथील जैन समाजाचे अध्यक्ष, मान्यवर व महाराष्ट्रातील जैन समाजाच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी महिला बचत गटाच्या रेणुका काले, मनीषा काले तसेच कालांश उद्योगचे नितीन काले पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित होते. कार्यक्रमात माताजींनी उद्योगास व सर्व महिला उद्योजकांना आशीर्वाद देत तरुणांनी उद्योग क्षेत्रात पुढे येऊन समाजासाठी प्रेरणादायी कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# खासगी मध्यस्थांमार्फत लाचखोरी

## नेवाशात ७ हजार घेताना सेतू चालक जेरबंद




### महसूलातील एजंट साखळीवर प्रश्नचिन्ह!

महसूल विभागातील कामांसाठी मध्यस्थांमार्फत पैसे उकळण्याची पद्धत पुन्हा उघड झाली आहे. या साखळीचा तपास करणे यंत्रणेसमोर मोठे आव्हान आहे. शासकीय कामांसाठी नागरिकांना मध्यस्थांवर अवलंबून राहावे लागणे, ही प्रशासनासाठी चिंतेची बाब असून महसूल विभागाने यावर नियंत्रण आणण्यासाठी कडक यंत्रणा उभी करण्याची गरज व्यक्त होत आहे.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा महसूल विभागात खासगी मध्यस्थांमार्फत सुरू असलेल्या लाचखोरीचा प्रकार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने उघडकीस आणला आहे. फेरफार आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी १२ हजारांची मागणी करून, त्यातील ७ हजार रुपये स्वीकारताना खासगी सेतू चालक गणेश कचरू घोरपडे याला रंगेहाथ अटक करण्यात आली.

तक्रारदाराच्या जमिनीचा फेरफार आदेश रद्द करण्याच्या सूचना उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिल्या होत्या. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी तक्रारदाराने नेवासा खुर्दचे मंडळाधिकारी बाबासाहेब माने यांची भेट घेतली. त्यावेळी कार्यालयाबाहेर असलेल्या सेतू चालक गणेश घोरपडे याने त्यांना गाठले. तुमचे काम साहेबांकडून करून देतो, त्यासाठी आम्हाला १२ हजार रुपये द्यावे लागतील, अशी मागणी त्याने केली. तडजोडीनुसार ५ हजार रुपये आधीच 'फोनपे'द्वारे देण्यात आले होते.

उर्वरित ७ हजार रुपयांसाठी घोरपडेने तगादा लावल्याने तक्रारदाराने 'एसीबी'कडे धाव घेतली. बुधवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास नेवासा खुर्द येथील 'गणेश मल्टी सर्व्हिसेस' केंद्रावर पडताळणी झाली. त्यात लाचेची मागणी सिद्ध झाली. त्यानंतर दुपारी २:३० वाजता ७ हजार रुपये स्वीकारताना एसीबीच्या पथकाने घोरपडेला रंगेहाथ ताब्यात घेतले. नाशिक आणि अहिल्यानगर एसीबीच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली असून नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोपरगाव शहरात तातडीने फवारणी करा : जनार्दन कदम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषदेच्या हद्दीत सध्या डासांचे मोठ्या प्रमाणावर साम्राज्य निर्माण झाले असून यामुळे शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगरपरिषदेने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करू नये. शहरात तातडीने औषध फवारणी करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक जनार्दन कदम यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून कोपरगाव शहरात डासांची संख्या वाढली आहे. सायंकाळ होताच शहरात डासांचा इतका प्रादुर्भाव वाढला आहे की नागरिकांना असह्य होत आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठांना डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारख्या जीवघेण्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

यामुळे वेळीच डासांवर उपाय योजना केल्या नाही तर काही दिवसांत शहरात विविध आजारांचे रुग्ण वाढत असल्याचे चित्र दिसून येईल. शहरातील स्वच्छता आणि आरोग्य ही नगरपरिषदेची प्राथमिक जबाबदारी आहे.

> नगरपरिषदेकडे औषध फवारणीसाठी यंत्रणा उपलब्ध असतानाही ती का वापरली जात नाही? नागरिकांकडून आरोग्य कर वसूल केला जातो, मग त्यांना सुविधा का दिल्या जात नाहीत? असा संतप्त प्रश्न उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक जनार्दन कदम यांनी कोणताही विलंब न लावता तातडीने संपूर्ण शहरात औषध फवारणी सुरू करण्याची मागणी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

# साकुरीत युवकाची आत्महत्या

## पतसंस्थेच्या वसुलीच्या त्रासाचा कुटुंबियांकडून आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता:** राहाता तालुक्यातील साकुरी येथे एका पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या वसुलीच्या त्रासाला कंटाळून एका युवकाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे साकुरी गावासह संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, साकुरी येथील योगेश गायकवाड या युवकाने काही दिवसांपूर्वी एका पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. मात्र कर्जफेडीचा तगादा वाढत असल्याने तो मानसिक तणावात होता, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे. दि. २५ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे एक ते दोन वाजण्याच्या सुमारास संबंधित पतसंस्थेचे वसुली कर्मचारी योगेश गायकवाड यांच्या घरी आले. त्यावेळी योगेश घरी नसून त्यांची आई घरी होती.

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करा

दरम्यान, पतसंस्थेच्या वसुलीच्या जाचाला कंटाळून योगेशने आत्महत्या केल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित पतसंस्थेच्या वसुली अधिकाऱ्यांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी मयताचा भाऊ निलेश गायकवाड यांनी शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच राहाता पोलीस ठाण्याकडे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

वसुली कर्मचाऱ्यांनी योगेशने घेतलेल्या कर्जाची रक्कम अद्याप भरलेली नसल्याचे सांगत पैसे भरण्याची मागणी केली. तसेच आम्ही अनेक वेळा फोन करत आहोत, पण तो फोन उचलत नाही. आज पैसे मिळाले नाहीत तर घर जप्त करू आणि तुम्हाला घराबाहेर काढू, अशी धमकी दिल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. यानंतर योगेशच्या आईने मुलाला फोन केला असता, वसुली कर्मचाऱ्यांनी तिच्या हातातील मोबाईल हिसकावून घेत योगेशशी थेट फोनवर बोलत त्याला पैशांबाबत दबाव टाकल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास योगेश घरी आला. मात्र तो कुणाशीही न बोलता थेट आपल्या खोलीत गेला. काही वेळानंतर आईने त्याला चहा घेण्यासाठी आवाज दिला, परंतु त्याने प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आईने खोलीत जाऊन पाहिले असता योगेशने साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले.

# पाऊलबुधे अध्यापक विद्यालयात स्पर्धा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हा अंतर्गत अध्यापक विद्यालयांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धांचे आयोजन डॉ. ना. ज. पाऊलबुधे अध्यापक विद्यालय येथे करण्यात आले होते. जिल्ह्यातील विविध अध्यापक विद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या जिल्हास्तरीय स्पर्धेत डॉ. ना. ज. पाऊलबुधे अध्यापक विद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये बक्षिसे मिळवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डाएटचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर होते. तसेच कार्यक्रमास प्रमुख पाहुणे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामकिसन देशमुख यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे सांगितले. प्रमुख उपस्थिती म्हणून संगमनेर डाएटचे वरिष्ठ अधिव्याख्याता लक्ष्मण सुपे, अधिव्याख्याता मुकुंद दहिफळे, डाएटचे सांख्यिकी सहाय्यक नितीन टिळेकर, लघुलेखक आशिष राऊत उपस्थित होते. विविध स्पर्धेमध्ये रांगोळी स्पर्धेत माया त्र्यंबके हिने प्रथम क्रमांक, निबंध स्पर्धेत मृणाली नजन प्रथम क्रमांक, पोस्टर्स स्पर्धा द्वितीय क्रमांक कोमल नढे, समूह गायन स्पर्धा तृतीय क्रमांक, थाळी फेक स्पर्धेत आरती लोखंडे द्वितीय क्रमांक, तर गोळा फेक मधे गंणगे गणेश याने द्वितीय क्रमांक मिळवला.

# शनैश्वर देवस्थान कर्मचाऱ्यांचे उपोषण सुटले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथील कामगार युनियनच्या वतीने प्रलंबित मागण्या मान्य न झाल्याने २ मार्चपासून मंदिर परिसरात साखळी उपोषणास सुरुवात झाली होती. दि. ४ मार्च रोजी कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी आंदोलनस्थळी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन प्रलंबित प्रश्नावर लवकर निर्णय घेण्याबाबतचे पत्र देऊन उपोषण मागे घेऊन देवस्थान प्रशासनास सहकार्य करण्याची विनंती केल्याने बुधवारी रात्री हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

कामगार आयुक्त यांच्यासमोर कर्मचारी युनियन व विश्वस्त मंडळ यांच्यामध्ये झालेल्या समझोत्यानुसार कर्मचाऱ्यांचा वेतन बदलातील फरक कर्मचाऱ्यांना थकीत वेतनासोबत अदा करण्यात यावा व २०२५ चा दिवाळी बोनस अजूनही न मिळाल्याने कामगार युनियनच्यावतीने दि. २ मार्चपासून उपोषणास सुरुवात करण्यात आली होती. भाविकांची गैरसोय होऊ नये, म्हणून कामगारांच्या वतीने ड्युटी चालू ठेवून मोठ्या संख्येने कामगारांनी उपोषणात सहभाग घेतला होता.

कामगार युनियनचे अध्यक्ष श्यामसुंदर शिंदे यांची उपोषणादरम्यान तब्येत ढासाळल्याने त्यांना वैद्यकीय उपचार सुरू करण्यात आले होते. दि. ४ मार्च रोजी कामगार युनियनचे आमच्या न्याय मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावा, या विनंतीचे पत्र कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले होते.

देवस्थानचे कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांनी पुढाकार घेत सायंकाळी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन सदर मागणीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर होत असलेल्या कार्यवाही बाबत आपणास देवस्थान प्रशासनाचे दि. २८ फेब्रुवारीचे पत्रानुसार देवस्थान प्रशासन आपल्या प्रलंबित प्रश्नावर लवकरात लवकर नियमानुसार निर्णय घेण्याबाबत सकारात्मक आहे, असे कळविलेले आहे.

आंदोलनकर्त्यांनी ही विनंती मान्य करून आंदोलन थांबवले आहे.



### ... गतवैभव परत येईल

विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांनी देवस्थानचा कारभार पाहण्यास सुरवात केल्यापासून देवस्थानमध्ये अनेक सकारात्मक बदल झाले आहे. भाविकांना सुविधा, ई ऑफिस, पारदर्शक खरेदी अशा अनेक गोष्टी घडल्याने याचे भाविकांतून कौतुक होत आहे. एक वर्षभर अधिकाऱ्यांच्या हातात कारभार राहिला तर नक्कीच भाविकांना समाधान व गतवैभव परत येईल, अशी चर्चा ग्रामस्थांत होत आहे.

# देवळालीत कानिफनाथ महाराज यात्रा जल्लोषात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : टाकळीमिया रोड परिसरात सुरू असलेल्या कानिफनाथ महाराज यात्रा उत्सवानिमित्त आयोजित सप्ताहाने देवळाली प्रवरा शहर अक्षरशः भक्तिरंगात न्हाऊन निघाले आहे. सकाळी सुरू नवनाथ ग्रंथ पारायण, मंत्रोच्चार आणि पूजा-विधींमुळे परिसरात अध्यात्मिक ऊर्जा संचारलेली जाणवत आहे.

सायंकाळ होताच कीर्तनसेवेने वातावरण भारावून जात आहे. टाळ-मृदुंगाच्या गजरात हरिनामाचा अखंड नाद घुमत असून भाविक तल्लीन होत आहे. स्त्री-पुरुष, युवक, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच स्तरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत आहे.

संपूर्ण मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, सुशोभित मंडप आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे उत्सवाचे स्वरूप अधिक भव्य झाले आहे. दररोज महाप्रसाद पंगतीत भाविक मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असून सामाजिक एकात्मतेचेही दर्शन घडत आहे. पारायण, हरिपाठ व कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे सप्ताहाला भक्तिमय मेजवानीचे रूप प्राप्त झाले आहे.

श्रद्धा, उत्साह आणि सामूहिक सहभाग यामुळे देवळाली प्रवरा येथे सध्या एक वेगळेच अध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळत आहे. मढी येथे कानिफनाथ यात्रेसाठी पायी जाणाऱ्या भाविकांची ओम चैतन्य कानिफनाथ प्रतिष्ठान व परिसरातील भाविकांच्यावतीने नाश्ताची व्यवस्था केली जात आहे.

# युवा सेनेकडून शिवजयंती उत्साहात साजरी

## आरती व जयघोषात परिसर दुमदुमला



> दरवर्षी युवा सेना आणि एमआयडीसीमधील कामगारांच्या सहभागातून नवनागापूर येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या शौर्य, धैर्य आणि दूरदृष्टीच्या बळावर अशक्य वाटणारे स्वराज्याचे स्वप्न साकार केले. त्यांनी स्वराज्यातील सर्व प्रजेला समान न्याय देत आदर्श प्रशासन उभे केले. आजच्या तरुणांनी शिवाजी महाराजांच्या शौर्य, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेम या गुणांचा आदर्श घेऊन समाजहितासाठी काम केले पाहिजे.
>
> **– योगेश गलांडे, जिल्हा प्रमुख, युवा सेना**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नवनागापूर येथील गजानन कॉलनी परिसरात युवा सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात नवनागापूर परिसरातील ग्रामस्थ, युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच एमआयडीसीमधील कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिवजयंतीनिमित्त नवनागापूर चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आरती करण्यात आली.

यावेळी जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमास युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, दत्ता पाटील सप्रे, आकाश कातोरे, उपसरपंच नरेश शेळके, बाबासाहेब डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य उमेश पाटील डोंगरे, दीपक गीते, लखन बैरागी, रंगनाथ गव्हाणे, सुभाष दांगट, संतोष गवारे, शंकर शेळके, विशाल चव्हाण, अक्षय पिसे, कल्याण जाधव, स्वप्निल भरड, सुनिल शेवाळे, अरबाज खान, गौरव पाटोळे, अमोल घुटे, गोरव पाटोळे, ग्रामपंचायत सदस्य गोरक्ष गव्हाणे, स्वप्निल खराडे, वसीम शेख, संतोष शेवाळे, अभिजित सांबारे, प्रदीप दहातोंडे, अजिनाथ शिरसाट, जितेंद्र तळेकर, शशीकांत संसारे, राहुल जगधने, राजेंद्र पारखे, नामदेव झेंडे, किसन तरटे, सचिन खेसे, संजय बागल, शिवाजी चौरे, शत्रुघ्न तांबे, अनिल गायकवाड, रामनाथ घुगे, प्रविण सोनवणे, सिद्धीनाथ पोकळे, अनिल शिरसाठ, भरत दिंडे, राहुल मेहेरखांब, गोरक्षनाथ खंडागळे, वैष्णव गलांडे, शिव गलांडे, अविनाश कर्डिले, नितीन खेसे, तुषार शेवाळे, निलेश शेवाळे, विष्णु घुगे, रामदास खरात, पवन क्षीरसागर, सागर पवार आदी मान्यवर उपस्थित होते. सरपंच डॉ. बबनराव डोंगरे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहे. समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आणि युवकांना योग्य दिशा देण्यासाठी शिवरायांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना सर्व समाजघटकांना न्याय देणारे आदर्श राज्य उभारले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन नवनागापूरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

# गोदड महाराज मंदिर विश्वस्त मंडळ रद्द करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : संत सद्गुरु गोदड महाराज समाधी मंदिरासाठी सर्व गावकऱ्यांना अंधारात ठेवून जे नवीन विश्वस्त मंडळ तयार करण्यात आले आहे, ते मंडळ नवीन विश्वस्तांनी स्वतःहून पुढाकार घेऊन तात्काळ बरखास्त करावे. अन्यथा गावकरी, मानकरी व पुजारी यांच्या संयुक्त पुढाकारातून कोणत्याही परिस्थितीत, कितीही संघर्ष करावा लागला तरी हे नवीन विश्वस्त मंडळ रद्द केल्याशिवाय राहणार नाही, असा ठाम इशारा माजी उपसरपंच व भारतीय जनता पक्ष ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब सोनमाळी यांनी पत्रकार परिषदेत दिला.

नवीन विश्वस्त मंडळाने अलीकडेच घेतलेल्या पत्रकार परिषदेत आंदोलनावर टीका करत अनेक प्रश्न उपस्थित केले होते. त्या पार्श्वभूमीवर गावकरी, मानकरी व पुजारी यांच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन या प्रश्नांना सडेतोड उत्तर देण्यात आले.



> नाथांच्या दर्शनासाठी जाणारी दिंडी ही पिकनिक नाही. साधुसंतांची मने फुलांपेक्षा हळवी असतात. तिथे अहंकार किंवा मी पणाला स्थान नसते. जिथे मी पण सुरू होते, तिथे खरी भक्ती संपते. नवीन विश्वस्त मंडळ अस्तित्वात आल्यानंतर सहा महिने गुप्तता पाळून नंतर मान्यता मिळाल्यावरच माहिती जाहीर करण्यात आली. जर कारभार पारदर्शक असेल, तर विश्वस्त मंडळ स्थापन होताच ते जाहीर का केले नाही.
>
> **– दादासाहेब सोनमाळी**

दादासाहेब सोनमाळी म्हणाले की, नवीन विश्वस्त मंडळाला सर्वसामान्य गावकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. विश्वस्त मंडळ स्थापन करताना सर्वांना विश्वासात घेणे आवश्यक होते. मात्र तसे न करता एका कुटुंबातील सदस्यांनाच स्थान देत विश्वस्त मंडळ तयार करण्यात आले, हे अत्यंत चुकीचे आहे.

ते पुढे म्हणाले की, संत सद्गुरु गोदड महाराज ही संतांची भूमी आहे. वैराग्यमूर्ती महाराजांनी राजघराण्याचा त्याग करून गोधडी पांघरली आणि भागवत धर्माचा प्रसार केला. त्यांच्या कार्यात कधीही गरीब-श्रीमंत, लहान-मोठा असा भेद नव्हता. अशा संतांच्या भूमीत नवीन विश्वस्तांनी आपली चूक मान्य करून हा वाद इथेच थांबवावा.

## ‘अध्यात्मिक शिक्षणा’च्या नावाखाली

# १२ वर्षांच्या विद्यार्थिनीचे शोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आळंदी** : अध्यात्मिक शिक्षण देण्याच्या नावाखाली अल्पवयीन विद्यार्थिनीचे शारीरिक व मानसिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार देवाची आळंदी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून संबंधित महाराज आणि त्यांच्या पत्नीविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील एका कुटुंबाने आपल्या दोन अल्पवयीन मुलींना भजन-कीर्तनाचे अध्यात्मिक शिक्षण घेण्यासाठी आळंदी येथील एका खासगी वारकरी शिक्षण संस्थेत पाठवले होते. या संस्थेत मूळ नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असलेले भाऊसाहेब माधवराव बोडके हे अध्यात्मिक शिक्षण देत असल्याचे सांगितले जाते. विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी त्यांनी पीडित मुलीच्या कुटुंबीयांकडून दरवर्षी ४१ हजार रुपये शुल्कही आकारले होते.




मात्र भजन-कीर्तनाचे शिक्षण देण्याऐवजी बोडके महाराज यांच्या पत्नी आशाताई बोडके यांनी त्या अल्पवयीन विद्यार्थिनींकडून घरातील धुणी-भांडी, झाडू-पोछा यांसारखी कामे करून घेतल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर पीडित मुलीकडून रात्री उशिरापर्यंत हात-पाय दाबून घेण्यासही भाग पाडले जात होते. या सततच्या त्रासामुळे संबंधित मुलगी मानसिक तणावाखाली गेल्याचे समोर आले आहे.

अखेर पीडित मुलीने आपल्या आई-वडिलांना घडलेला प्रकार सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने नांदेड जिल्ह्यातील मुखेड पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी भाऊसाहेब माधवराव बोडके आणि आशाताई बोडके या पती-पत्नीविरुद्ध भारतीय न्याय

### महाराज व पत्नीवर गुन्हा

संहिता तसेच बाल न्याय (काळजी व संरक्षण) कायदा २०१५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, अध्यात्मिक शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थिनींचे शारीरिक व मानसिक शोषण करणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करावी तसेच संबंधित शिक्षण संस्था तात्काळ बंद करण्यात यावी, अशी मागणी पीडित मुलीच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# संकेत वाणी ‘सीए’ उत्तीर्ण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**गोडेगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील तालुक्यातील मातुलठाण येथील संकेत सुनीलराव वाणी याने सीए परीक्षेत यश संपादन करत गावाचे परिसरातील नाव उज्वल केले आहे, शेतकरी कटूंबातील पार्वभूमी असलेल्या संकेतने जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभयासाच्या बळावार यश संपादन केले आहे. संकेतचे

वडील सुनिलराव कानवडे तसेच काका दिपकराव वाणी दोघेही शेती व्यवसायाशी निगडित असून, प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी मुलाच्या

शिक्षणासाठी भक्कम पाठबळ दिले. ग्रामीण भागातील मर्यादित साधन-सुविधांमध्ये शिक्षण घेत असताना संकेतने सीएसारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करून कुटुंबाची व गावाची मान उंचावली आहे. शेतकरी कुंटुबातील मुलांने गाठलेले हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्याच्या या यशाबद्दल परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ‘मटेरियल सायन्समुळे विज्ञान-तंत्रज्ञानाला नवे क्षितिज’

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : मानवजातीच्या प्रगतीच्या प्रवासात मटेरियल सायन्स आणि विज्ञान-तंत्रज्ञानाचे महत्त्वपूर्ण योगदान असून या क्षेत्रातील संशोधनामुळे उद्योग, आरोग्य, संप्रेषण आणि संशोधन क्षेत्रात नवनवीन संधी निर्माण होत आहेत, असे प्रतिपादन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी केले.

रयत शिक्षण संस्था संचलित श्री सद्गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालय, कोपरगाव येथे विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील अत्याधुनिक संशोधन व नवोपक्रमांवर आधारित ‘‘-२०२६’’ या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. म्हस्के यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे माजी कुलगुरू



डॉ. पंडित विद्यासागर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

डॉ. म्हस्के म्हणाले की, औद्योगिक क्रांतीची सुरुवात वाफेच्या शोधापासून झाली आणि उत्पादन व वाहतूक क्षेत्रात मोठा बदल घडून आला. त्यानंतर जैविक ऊर्जेचा वापर आणि विजेच्या शोधामुळे मानवी जीवन अधिक गतिमान झाले. पुढे इलेक्ट्रॉनिक्सच्या शोधाने संप्रेषण व यांत्रिकी क्षेत्रात क्रांती घडवली. प्रमुख अतिथी डॉ. पंडित विद्यासागर यांनी उच्च शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, उच्च शिक्षण विद्यार्थ्यांना सुरक्षित भविष्याची दिशा देण्याबरोबरच संशोधनाची आवड निर्माण करते. तसेच वेळेचे व्यवस्थापन, स्वअनुशासन, जटिल ज्ञान समजून घेण्याची क्षमता आणि नव्या तंत्रज्ञानाच्या विकासात योगदान देण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित होते. ‘माइंड’ म्हणजे विचार, जाणीव, कल्पनाशक्ती, आकलन, बुद्धिमत्ता, निर्णयक्षमता आणि स्मरणशक्ती यांचा समुच्चय असून शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे. , आणि या तत्त्वांवर आधारित शिक्षणव्यवस्था समाजनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावते, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट करताना विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्या संशोधनाला चालना देणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे हा असल्याचे सांगितले. पाहुण्यांचा परिचय अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. निलेश मालपुरे यांनी करून दिला.

या उद्घाटन समारंभाला प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, प्रांजल चित्ते (नाशिक), संतोष शिंदे (कोल्हापूर), डॉ. सचिन रौंदिया व डॉ. कृतिक पी. एस. (बेंगळूर), पराग मोरे (मुंबई), डॉ. सुभाष बेंद्रे (जळगाव) यांच्यासह विषयतज्ञ, अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. चेतना काळे, प्रा. प्रियांका पवार आणि प्रा. श्रुती पाटील यांनी केले, तर आभार विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. घनश्याम भगत यांनी मानले.

# परिचर्या सेवेतून समाजाचे आरोग्य उंचावेल : सौ. विखे पा.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ‘‘रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असून समाजाचे शारीरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य उंचावण्याची मोठी जबाबदारी परिचर्या विद्यार्थ्यांवर आहे. सेवाभाव, शिस्त आणि समर्पण या गुणांच्या जोरावर परिचर्या विद्यार्थी समाजाच्या आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम बनवतील,’’ असा विश्वास माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मा. सौ. शलिनीताई विखे पाटील यांनी व्यक्त केला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या परिचर्या महाविद्यालयात दि. ५ मार्च रोजी दीपप्रज्वलन, शपथग्रहण, पदवी प्रदान, माजी विद्यार्थी मेळावा आणि वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मा. सौ. शलिनीताई विखे पाटील या प्रमुख



अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच फाउंडेशनचे विश्वस्त मा. वसंतराव शाहूजी कापरे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या १२० विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकाचे तसेच नर्सिंगच्या शिक्षकांनी लिहिलेल्या ‘‘नर्सिंगमध्ये नेतृत्व आणि व्यवस्थापन’’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

संस्थेचे चेअरमन मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनीही पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला संस्थेचे सेक्रेटरी डॉ. पी. एम. गायकवाड (टेक्निकल), संचालक (मेडिकल) प्रा. डॉ. अभिजीत दिवटे, ब्रिगेडियर डॉ. अरुण त्यागी (क्लिनिकल डायरेक्टर), मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. रामचंद्र पडळकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या डॉ. प्रतिभा चांदेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करून परिचय करून दिला. प्रा. अमोल टेमकर यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. सौ. मोहिनी सोनावणे यांनी पदवी प्रदान कार्यक्रमाचे नियोजन केले, तर श्री. निलेश म्हस्के यांनी माजी विद्यार्थी मेळाव्याचे नियोजन केले. वार्षिक नियतकालिक आणि पुस्तक प्रकाशनाचे काम सौ. पूजा मोरे व श्री. राहुल कडू यांनी पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. स्टीफन भांबळ व सौ. ऋषाली कुंजिर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमित कडू, प्रा. सौ. सलोमी तेलधुणे, सौ. कविता भोकनाळ, सौ. पल्लवी कोळपकर, सौ. पल्लवी खराडे, सौ. वर्षा शिंदे व सौ. विद्या कुऱ्हे यांनी परिश्रम घेतले. उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांनी आभार प्रदर्शन केले.

# जमिनीच्या वादातून घरात घुसून कोयत्याने हल्ला

### तरुण गंभीर जखमी, सात जणांवर गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील टाकळीभान येथे वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या वादातून घरात घुसून कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात तन्वीर सलिम शेख (वय २७) हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तन्वीर शेख हा टाकळीभान येथील घुमनदेव रोड परिसरात पत्नी व मुलांसह वास्तव्यास आहे. टाकळीभान शिवारातील वक्फ बोर्डाच्या गट क्रमांक ४९ मधील जमिनीच्या ताब्यावरून तन्वीर शेख आणि आरोपी बादशहा शेख यांच्यात मागील काही दिवसांपासून वाद सुरू होता. तन्वीर शेख तीन एकर जमीन कसत असून उर्वरित जमीन आरोपी बादशहा शेख कसत असल्याने त्यावरून वाद निर्माण झाला होता.

दरम्यान, ४ मार्च रोजी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास तन्वीर शेख घरी असताना आरोपी बादशहा शेख हा काळ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून काही जणांसह त्याच्या घरासमोर आला. त्याच्यासोबत यास्मीन इमाम शेख, तौफिक सत्तार शेख आणि मुज्जु सादिक सय्यद हे होते. तसेच झिशान इमाम शेख, रज्जाक इमाम शेख आणि रेहान इमाम शेख हे मोटारसायकलवरून तेथे आले.

आरोपींनी घरात घुसून शिवीगाळ करत तन्वीर शेखवर हल्ला चढविला. मुज्जु सादिक सय्यद याने कोयत्याने तन्वीरच्या डोक्यावर वार केला. त्यानंतर इमाम बादशहा शेख याने कोयत्याने त्याच्या डाव्या हातावर कोपराजवळ वार केला, तर यास्मीन इमाम शेख हिने उजव्या हाताच्या मनगटावर कोयत्याने वार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या हल्ल्यात तन्वीर शेख गंभीर जखमी झाला. आरोपींनी त्याला लाथाबुक्क्यांनी व दगडानेही मारहाण केली तसेच घरातील संसारोपयोगी वस्तूंची तोडफोड केली.

हल्ल्यानंतर आरोपींनी कपाटातील सुमारे ६५ हजार रुपये रोख रक्कम काढून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या झटापटीत तन्वीरची पत्नी आसमा हिलाही किरकोळ दुखापत झाली.

या प्रकरणी तन्वीर शेख यांच्या फिर्यादीवरून इमाम बादशहा शेख, यास्मीन इमाम शेख, झिशान इमाम शेख, रज्जाक इमाम शेख, रेहान इमाम शेख (सर्व रा. टाकळीभान, ता. श्रीरामपूर), तौफिक सत्तार शेख (रा. श्रीरामपूर) आणि मुज्जु सादिक सय्यद (रा. पार्थडी, जि. अहिल्यानगर) तसेच इतर चार ते पाच अनोळखी व्यक्तींविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलिस करत आहेत.

# निफाड तालुक्यातील सोनेवाडी खुर्द ठरले पहिले ‘ऑनलाइन रेशनकार्ड गाव’

### ई-शिधापत्रिकेमुळे धान्य वितरणात पारदर्शकता

**जनता आवाज वृत्तसेवा**


**नाशिक** : ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान’ अंतर्गत निफाड तालुक्यात एक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला असून सोनेवाडी खुर्द हे गाव तालुक्यातील पहिले ‘ऑनलाइन रेशनकार्ड गाव’ म्हणून घोषित करण्यात आले आहे. डिजिटल पद्धतीने शिधापत्रिकांची नोंदणी आणि माहिती अद्ययावत केल्यामुळे धान्य वितरण व्यवस्थेत पारदर्शकता वाढण्यास मदत झाली आहे.

सोनेवाडी खुर्द येथील रास्तभाव दुकानाचे परवाना धारक दुर्गामाता महिला बचत गट असून गावातील सर्व पात्र लाभार्थ्यांची माहिती डिजिटल प्रणालीमध्ये अद्ययावत करण्यात आली आहे. शिधापत्रिकांची ऑनलाइन नोंदणी, आधार संलग्नता तसेच धान्य वितरणाची नोंदणी पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे.

गावात एकूण १११ शिधापत्रिकाधारक असून त्यामध्ये ४५ सदस्य असलेल्या १२ अंत्योदय योजना शिधापत्रिका आहेत. तसेच ३७८ अन्न सदस्य संख्या असलेल्या प्राधान्य कुटुंब योजनेच्या शिधापत्रिका आहेत. अशा प्रकारे गावातील एकूण लाभार्थी सदस्य संख्या ४२३ इतकी आहे.

**स्मार्ट रेशनकार्डच्या दिशेने पहिले पाऊल**

डिजिटल युगात ई-शिधापत्रिका ही स्मार्ट रेशनकार्डच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत असल्याचे प्रशासनाने सांगितले. या प्रणालीमुळे धान्य वितरणाची नोंद रिअल टाइम पद्धतीने होत असल्याने व्यवहारातील पारदर्शकता वाढली आहे. तसेच




लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य वेळेवर मिळण्याची खात्री निर्माण झाली आहे.

याशिवाय नाव दुरुस्ती, सदस्य वाढवणे किंवा कमी करणे यांसारखी कामेही ऑनलाइन पद्धतीने सहज शक्य होत असल्याने नागरिकांची सोय झाली आहे.

निफाडचे प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे म्हणाले की, डिजिटल प्रणालीमुळे पारदर्शकता वाढून नागरिकांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ होतो. सोनेवाडी खुर्द गावाने या उपक्रमातून तालुक्यात एक आदर्श निर्माण केला असून इतर गावांनीही ही पद्धत अवलंबावी, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी सांगितले की, महसूल समाधान शिबिर अभियानाच्या माध्यमातून विविध शासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. सोनेवाडी गावातील जीर्ण शिधापत्रिका बदलून ई-शिधापत्रिका करण्यात आल्या असून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. त्यामुळे हे गाव इतरांसाठी आदर्श ठरले आहे.

# ठिबक अनुदान गैरव्यवहार; २ कृषी अधिकारी निलंबित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : जुन्नर तालुक्यातील बेल्हे कृषी मंडळांत ठिबक सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात गैरव्यवहार झाला असून, याप्रकरणी दोन कृषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.उपविभागीय कृषी अधिकारी सतीश शिरसाठ यांनी ठिबक संचासाठी आलेल्या ४६१ प्रस्तावांची पडताळणी केल्यानंतर त्यात ३४८ प्रस्ताव बनावट असल्याचे आढळले.

त्यानंतर या प्रस्तावांचे अनुदान वेळीच रोखल्याने राज्य सरकारचे २ कोटी ८६ लाख वाचले आहेत. तर १५ बनावट शेतकऱ्यांना देण्यात आलेले ५ लाख ८८ हजार वसूल करण्यात आले. यात तीन दुकानदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेत ठिबक संचासाठी अनुदान देण्यात येते. त्यासाठी पात्र शेतकऱ्यांकडून अर्ज मागविले जातात. त्यानुसार बेल्हे कृषी मंडळात ४६१ प्रस्ताव आले होते. मात्र, शिरसाठ यांना नियमित तपासणीत संशय आल्याने त्यांनी या प्रस्तावांची छाननी करण्याचे आदेश दिले. त्यासाठी चार पथकांची स्थापना करण्यात आली. या तपासणीत ३४८ प्रस्ताव बनावट होते.

# अडबंगनाथ येथे नारायणगिरी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भामाठाण** : ब्रह्मलीन आत्मज्ञानी सद्गुरू नारायणगिरीजी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान ट्रस्ट, भामाठाण येथे बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. फाल्गुन वद्य अमावस्या या पवित्र तिथीनिमित्त हा सोहळा संपन्न होणार असून भाविकांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने तसेच श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य स्वामी अरुणनाथगिरी महाराज यांच्या



प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली हा पुण्यतिथी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता नाथांची आरती व प्रार्थनेने होणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता नाथांचा अभिषेक व ब्रह्मलीन सद्गुरू नारायणगिरीजी महाराज यांचे सद्गुरू पूजन करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता स्वामी अरुणनाथगिरी महाराज यांचे सत्संग प्रवचन होणार असून त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत त्यांचे सुमधुर हरी कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. कीर्तन व ज्ञानामृत श्रवणानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री क्षेत्र अडबंगनाथ संस्थान ट्रस्ट, भामानगर, मु.पो. भामाठाण ता. श्रीरामपूर येथे होणाऱ्या या पुण्यतिथी महोत्सवाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे मठाधिपती स्वामी अरुणनाथगिरी महाराज व संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# राहुरी पोटनिवडणुकीत सुभाष पाटील यांना संधी द्यावी

### राहुरी तालुक्यातून मागणी : पक्षश्रेष्ठींच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी विधानसभा मतदारसंघातील आगामी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते सुभाष पाटील यांना उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी तालुक्यातून जोर धरत आहे. दीर्घकाळापासून राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या सुभाष पाटील यांना यावेळी पक्षाने संधी द्यावी, अशी अपेक्षा कार्यकर्ते आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी सुभाष पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आपल्या राजकीय प्रवासाबाबत खंत व्यक्त केली होती. अनेक वर्षे पक्षासाठी काम करूनही योग्य संधी मिळालेली नाही, अशी भावना त्यांनी व्यक्त केली होती. त्यांच्या या वक्तव्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली होती.त्यानंतर आता तालुक्यातील विविध कार्यकर्ते, पदाधिकारी आणि समर्थकांकडून पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्या भावना लक्षात घेऊन त्यांना पोटनिवडणुकीत संधी द्यावी, अशी मागणी होत आहे.



सुभाष पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून राहुरी तालुक्यात विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. शेतकरी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर त्यांचा चांगला जनसंपर्क असल्याचे मानले जाते. या पार्श्वभूमीवर त्यांना उमेदवारी दिल्यास निवडणुकीत चांगली चुरस निर्माण होईल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

राहुरी मतदारसंघातील राजकीय समीकरणे पाहता सुभाष पाटील यांना संधी दिल्यास कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण होईल, असेही बोलले जात आहे. तसेच त्यांच्या अनुभवाचा आणि जनसंपर्काचा फायदा पक्षाला होऊ शकतो, अशीही चर्चा सुरू आहे. त्यामुळे अनेक कार्यकर्ते आणि स्थानिक पदाधिकारी यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. दरम्यान, पोटनिवडणुकीसंदर्भात विविध संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत असतानाच सुभाष पाटील यांचे नावही पुढे येऊ लागले आहे. त्यामुळे आगामी काळात पक्षश्रेष्ठी कोणता निर्णय घेतात, याकडे राजकीय वर्तुळासह मतदारांचेही लक्ष लागले आहे.

आता पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने स्थानिक पातळीवरील भावना आणि कार्यकर्त्यांच्या अपेक्षा लक्षात घेऊन सुभाष पाटील यांना उमेदवारी देणार का, की अन्य पर्यायावर शिक्कामोर्तब करणार, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे राहुरी पोटनिवडणुकीच्या राजकारणाला दिवसेंदिवस अधिक रंग चढताना दिसत आहे.

दैनिक जनता आवाज
अहिल्यानगर, शनिवार, दि. ०७ मार्च २०२६ पान नं. ८

## मढी दिंडीचे अस्तगावमध्ये स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** राहाता येथील वै. तात्याभाऊ भगत आस्थान दिंडीचे श्री क्षेत्र मढीकडे पायी प्रस्थान झाले आहे. या पायी दिंडीचे अस्तगाव येथे आगमन होताच ग्रामस्थांच्या वतीने भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. राहाता ते श्री क्षेत्र कानिफनाथ (मढी) अशा या पायी प्रवासात दिंडीचे पहिले पाऊल अस्तगावमध्ये पडले. येथील जगदंबा माता मंदिरात दिंडी विसावली असता, ग्रामस्थांनी वारकऱ्यांचे पूजन करून स्वागत केले. कडक उन्हाचा तडाखा लक्षात घेता, सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब त्रिभान यांच्या वतीने दिंडीतील सर्व भाविकांना थंडगार लस्सीचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी गणेश कारखान्याचे माजी संचालक विजय गोर्डे, माजी सरपंच आर. बी. चोळके, सावता नर्सरीचे मालक संजय जेजुरकर, नंदकुमार जेजुरकर, पोपट त्रिभान, रामदास त्रिभुवन, शिवदास त्रिभुवन, भाऊसाहेब त्रिभान, भीमराज त्रिभान, राधाकिसन त्रिभान, अविनाश जेजुरकर, संजय जेजुरकर, भाऊसाहेब कोकाटे, सागर जेजुरकर, रवींद्र जेजुरकर, सार्थक त्रिभान, दादासाहेब गवांदे यांच्यासह गावातील तरुण मंडळी आणि महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लग्नामध्ये डीजे लावणे पडणार महागात

## ३७ जणांना नोटिसा; मंगल कार्यालय मालकांवर कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** लग्नाची वरात, हळदीच्या कार्यक्रमासाठी कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविल्यास मंगल कार्यालय मालक, डीजे चालकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. डीजेला आता मंगल कार्यालय चालकांनाही जबाबदार धरले जाणार आहे. शहरासह उपनगरांतील ३६ मंगल कार्यालयांना पोलिसांकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

सध्या दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. मुलांच्या परीक्षा सुरू असल्याने अनेकजण घरातील टीव्ही बंद ठेवतात. मात्र रस्त्यावर बिनधास्तपणे गर्दीत वरात काढून कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविले जातात. रस्त्याने जाणाऱ्या लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिलांना आवाजाचा त्रास होतो. रस्त्याची एक बाजू यामुळे अडविली जाते. परिणामी वाहतुकीची कोंडी होते. वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागतो. मंगल कार्यालयांत ही हळदीचा




कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालतात. गाणे, डीजेचा कर्णकर्कश आवाजाने परिसरातील नागरिकांची अक्षरशः झोप उडविली आहे. या आवाजामुळे मुलांना अभ्यास करता येत नाही.

डीजे वाजविल्यास डीजे मालक, ऑपरेटर, मंगल कार्यालयांचे मालक, जनरेटर वाहन चालकांना जबाबदार धरून संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

नाही. ज्येष्ठ नागरिकांना आवाजाने त्रास होतो. त्यामुळे रात्री १० ते सकाळी ६ यावेळेत डीजे वाजविण्यास बंदी आहे. असे असताना रात्री उशिरापर्यंत डीजे वाजविले जातात. बहुतांश लग्नसमारंभ मंगल कार्यालयात पार पडतात. डीजेच्या आवाजावर नियंत्रण ठेवणे मंगल कार्यालय चालकांची ही जबाबदारी आहे. मात्र मंगल कार्यालयांचे मालक डीजेवर नियंत्रण ठेवत नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. पोलिसांनी कोतवाली, भिंगार आणि तोफखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मंगल कार्यालय चालकांना नोटिसा बजावल्या आहेत. यापुढे लग्नसमारंभ, वरात, हळदीच्या कार्यक्रमात डीजे वाजविल्यास पर्यावरण व ध्वनी प्रदूषण कायद्यानुसार कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### नागरिकांना आवाहन

शहर व परिसरातील शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, मंगल कार्यालय परिसर, रस्त्याने कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविला जात असल्यास नागरिकांनी हेल्पलाइन ११२ वर कॉल करून माहिती द्यावी, असे आवाहन पोलिस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**




**श्रीगोंदा :** हिंदू हृदयसम्राट प्रतिष्ठानच्या वतीने श्रीगोंदा शहरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. प्रतिमा पूजन भूषण महाराज महापुरुष, पोलीस निरीक्षक किरण शिंदे, शिवसेना नेते मनोहरदादा पोटे, नगरसेवक योगीराज गाडे, नगराध्यक्ष सुनीताताई खेतमाळीस व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे आवाहन केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करत सर्वसामान्यांना न्याय देणारे राज्य निर्माण केले. त्यांच्या शौर्य, धैर्य आणि दूरदृष्टीमुळे आजही तरुण पिढीला प्रेरणा मिळत असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन हिंदू हृदयसम्राट प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब दूतारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाला बबनदादा पाचपुते, अत्तरभाई शेख, पांडुरंग पोटे, शिवाजी समदडे, हरिभाऊ काळे, संतोष चिकलठाणे, नितीन लोखंडे, सागर खेडकर, गणेश लाटे, ओमकार शिंदे उपस्थित होते.

## करंजीतील पाणलोटच्या कामाची चौकशीची मागणी

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन: उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** करंजी (ता. पाथर्डी) येथील ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत जलसंधारण व पाणलोटची इतर कामे मोठ्या प्रमाणात केली असून या कामांमध्ये अनियमितता असुन अत्यंत निकृष कामे झाली आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाले असल्याने या कामाची चौकशी करावी, अशी मागणी आबासाहेब अकोलकर व ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असेः करंजी (ता. पाथर्डी) येथे गेल्या काही दिवसांपासून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत विविध कामे चालू आहेत, ही कामे करताना शासनाचे नियम डावलून कामे करण्यात आली आहेत. पाणलोट समिती बदलून दुसरीच समिती नेमली. लाभार्थ्यांना प्राधान्य क्रमाने लाभ द्यायला



हवी असताना त्यांना लाभ न देता तो निधी दुसरीकडेच वळवून कामे करण्यात आली. गॅबियन बंधारे तसेच काही बंधाऱ्याची खोली करण्याची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहे.

शेतकरी गट स्थापन करताना शेतकऱ्यांना संधी न देता मर्जीतील शेतकऱ्यांना कामे दिली आहेत. त्यामुळे पाणलोट समितीच्या स्थापनेपासून आजपर्यंत केलेल्या कामाची चौकशी गुणनियंत्रण विभागाकडून करावी तोपर्यंत पेमेंट अदा करू नये, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर आबासाहेब अकोलकर, बाळासाहेब अकोलकर, सुनील साखरे, राहुल आकोलकर, नवनाथ आरोळे, आसाराम अकोलकर, परशुराम अकोलकर, दिलीप आहेर, मारुती क्षेत्रे, प्रशांत अकोलकर, विवेक मोरे , विश्वास क्षेत्रे, बाबासाहेब मोरे आदींच्या सह्या आहेत.

> आमच्या कार्यकाळातील कामाची चौकशी तुम्ही कराच. मात्र सन २०२२ -२३ या काळात पंधराव्या वित्त आयोगातून सरपंच व उपसरपंचाने संगनमताने करोडो रुपये काढून भ्रष्टाचार केला याची पण चौकशी करा. ज्याचा भ्रष्टाचार सिद्ध होईल त्याचेवर गुन्हा दाखल करा.
>
> **– नसीम रफीक शेख,** सरपंच, करंजी.


## गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविरुद्ध लसीकरण

### महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांवर सुविधा उपलब्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगरपालिका क्षेत्रात गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली असून, या संदर्भात महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी नुकतीच बैठक घेतली.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मोहिमेचा राष्ट्रीय शुभारंभ करण्यात आला असून, आता राज्य स्तरावर ८ मार्च रोजी महिला दिनाचे औचित्य साधून या मोहिमेला सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्त यशवंत डांगे यांनी आरोग्य विभागाला ही मोहीम प्रभावीपणे राबवण्याच्या आणि लाभार्थ्यांचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शहरातील सर्व आरोग्य केंद्रावर ८ मार्चपासून ही सुविधा उपलब्ध असेल, असेही आयुक्त




यशवंत डांगे यांनी सांगितले.

मोहिमेबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांनी बैठकीत माहिती दिली. भारतातील महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकाचा असून ९९.७ टक्के रुग्ण हे एचपीव्ही विषाणूमुळे बाधित होतात. या आजारावर संरक्षण मिळवण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची आहे. महानगरपालिकेने एकूण लोकसंख्येच्या एक टक्का म्हणजेच अंदाजे ४ हजार लाभार्थी मुलींचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यामध्ये प्रामुख्याने १४ वर्षे पूर्ण केलेल्या आणि १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींचा समावेश असून, मोहीम सुरू झाल्यानंतर पुढील ९० दिवसांच्या कालावधीत ज्या मुली १५ वर्षांच्या होतील, त्यांनाही या लसीकरणाचा लाभ घेता येणार आहे.

### गार्डासिल-४ ही लस वापरणार

मोहिमेत गार्डासिल-४ ही लस वापरली जाणार असून, ती लाभार्थी मुलीच्या डाव्या हाताच्या वरच्या भागात स्नायूमध्ये ०.५ मि.ली. या प्रमाणात दिली जाईल. विशेष म्हणजे या मोहिमेत लसचा केवळ एकच डोस दिला जाणार असून, लसीकरण पूर्ण झाल्यावर लाभार्थीच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मार्कर पेनने खूण केली जाईल. लसीच्या साठवणुकीसाठी २ ते ८ अंश सेल्सिअस तापमानाची खबरदारी घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## चार महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा

### सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कर्जत :** कर्जत आणि जामखेड तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या चार महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून त्यांना 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा अधिकृत दर्जा बहाल करण्यात आला आहे. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या तीर्थक्षेत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता, त्यांच्या या प्रयत्नांना आता मोठे यश प्राप्त झाले आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागाने ५ मार्च २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केले आहेत. या निर्णयामुळे जामखेड तालुक्यातील श्री जवळेश्वर देवस्थान (जवळा) या ऐतिहासिक देवस्थानासह कर्जत तालुक्यातील श्री क्षेत्र जगदंबा मंदिर देवस्थान (कुळधरण), श्री खंडोबा देवस्थान (शेगुड) आणि श्री लालगीर बुवा मठ ट्रस्ट (मांदळी) या चारही देवस्थानांचा आता ब वर्ग श्रेणीत समावेश झाला आहे. तीर्थक्षेत्राला ब वर्ग दर्जा प्राप्त झाल्यामुळे आता या ठिकाणी पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी आणि विकासासाठी शासनाकडून पाच कोटी रुपये प्रत्येक तीर्थक्षेत्रासाठी निधी उपलब्ध होऊ शकणार असून, यामध्ये प्रामुख्याने भाविकांच्या निवासासाठी सुसज्ज भक्तनिवास, सभागृह, तीर्थक्षेत्राकडे जाणारे प्रशस्त रस्ते, अंतर्गत सुशोभीकरण, पिण्याच्या पाण्याची सोय आणि सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या कामांना प्राधान्य मिळणार आहे.

## 'ज्ञानेश्वर' जास्त भाव देण्यात नेहमी पुढे राहील

### नरेंद्र घुले पाटील : साखर कारखान्याच्या ५२ व्या गळीत हंगामाची सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भेंडे :** ज्ञानेश्वर कारखाना पुढील काळात कुठलाही भांडवली खर्च नाही. वेळेत ऊस तोडणी करून प्रतिटन ३ हजार रुपये प्रमाणे ऊस पेमेंट वेळेतच शेतकऱ्यांच्या बँक खाते वर्ग केले गेले, या पुढील काळात ही ज्ञानेश्वर कारखाना जास्त ऊस भाव देण्यात कायमच पुढे राहिल, अशी ग्वाही लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी केले.

लोकनेते मास्तराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे ५२ व्या गळीत हंगामाची सांगता कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे हस्ते व जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, संचालक अ‍ॅड.



देसाई देशमुख, काकासाहेब नरवडे यांचे प्रमुख उपस्थितीत झाली, त्यावेळी घुले बोलत होते. संचालक काकासाहेब शिंदे, काशीनाव नवले, प्रा. नारायण मास्ये, शिवाजीराव कोलते, मच्छिंद्र महस्के, बबनराव भुसारी, पंडितराव भोसले, जनार्दन कदम, सखाराम लव्हाळे, विकास नन्नवरे, अशोकराव मिस्तळ, दादासाहेब गंडाळ, विष्णु जगदाळे, संतोष पावने, सुखदेव फुलारी, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मैनेजर रविंद्र मोटे व्यासपीठवर उपस्थित होते. प्रारंभी अशोकराव मिसाळ व लताताई मिसाळ, अरुण कवडे व आरती कवडे या उभयतांच्या हस्ते विधिवत गव्हाण पूजा करण्यात आली.

घुले पुढे म्हणाले की सर्वांच्या सहकार्याने हंगाम अतिशय चांगला पार पडला. सहकारात ऊस गाळपात आपला कारखाना जिल्ह्यात एक नंबरवर आहे. १० लाख टन ऊस गाळप, ४ कोटी वीज निर्यात केली. या हंगामात १ कोटी ८० लाख लीटर इथेनॉल तयार करणार आहोत.

### बाहेरील कारखान्यांनी ऊस पळविला

माजी आ. पांडुरंग अभंग म्हणाले की, या हंगामात १२.५ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट होते, मात्र बाहेरील कारखान्यांना ऊस गेल्याने ते पूर्ण होऊ शकले नाही. ज्ञानेश्वर कारखान्याने ऊस भावाची कोंडी फोडली, त्याच्या फायदा सर्व शेतकऱ्यांना झाला, तरीही ऊस बाहेर दिला गेला. यावर्षी पाणी उपलब्ध असल्याने ऊस लागवड वाढलेली आहे.

## कोकमठाण येथे आज समाधान शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी :** राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत नागरिकांचे शासकीय विभागांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मंडळ स्तरावर एक दिवशीय समाधान शिबिराचे आयोजन करणे प्रास्ताविक आहे. त्यानुसार कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण मंडळात आ. आशुतोष काळे यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ चे भव्य आयोजन रामदासी महाराज आश्रम, कोकमठाण येथे शनिवार दि. ७ रोजी सकाळी ९ ते सायं ५ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते उप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यामध्ये कोकमठाण मंडळातील शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करून तक्रारी निकालात काढल्या जाणार आहे. सामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांना आपल्या शासकीय कामांसाठी, दाखल्यांसाठी किंवा जमिनीच्या नोंदींसाठी विविध शासकीय कार्यालयांमध्ये वारंवार चकरा माराव्या लागतात. यामुळे वेळ आणि पैसा दोन्हीचा अपव्यय होतो. हीच बाब लक्षात घेऊन आ. आशुतोष काळे यांनी पुढाकार घेऊन समाधान शिबिराचे नियोजन केले आहे. यामुळे कोकमठाण परिसरातील ग्रामस्थांना एकाच दिवसात आणि एकाच ठिकाणी आपले प्रलंबित प्रश्न मार्गी लावता येणार आहेत.

## छत्रपती शिवरायांमुळे मंदिरात देव राहिला

### प्रकाश नंदगिरीजी महाराज; शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**




**टाकळीभान :** छत्रपती शिवरायांमुळे मंदिरात देव राहिला असून हिंदूधर्म टिकला, असे उद्गार देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाश नंदगिरी महाराज यांनी काढले. सालाबाद प्रमाणे टाकळीभान येथे तिथीनुसार ६ मार्च २०२६ रोजी शिवजयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाश नंदगिरीजी महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी स्वामी प्रकाश नंदगिरीजी महाराज व हनुमान गडचे प्रमुख ह.भ.प. संतोष महाराज चौधरी या संत मंडळींच्या हस्ते युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी छत्रपती शिवरायांची आरती महाराजांच्या हस्ते संपन्न झाली.

प्रकाश नंदगिरी महाराज म्हणाले की, अठरापगड जाती सर्वांना बरोबर घेऊन छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापन केले. आज देवळातील देव, मंदिरे व हिंदू धर्म छत्रपती शिवरायांमुळे टिकला. ते टिकवण्याकरता छत्रपती शिवराय व मावळ्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही, त्यांचे ऋण कधी न फिटण्यासारखे आहे. तरुणांनी निर्व्यसनी राहावे असा संदेश दिला.

याप्रसंगी शिवजयंती कार्यक्रम प्रसंगी धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब आवरे पाटील यांचा शिवप्रेमी व ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला.


# भाजीच्या फोडणीमधून कढीपत्ता गायब

## दर तीनशे रुपये किलोवर; लिंबाचेही भाव भिडला गगनाला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** लांबलेला पाऊस आणि हवामान बदलामुळे कढीपत्ता लागवड आणि उत्पादनावर परिणाम झाला आहे. यामुळे एरवी नाममात्र भावात मिळणारा कढीपत्ता चांगलाच महागला आहे. कढीपत्त्याबरोबर लिंबाचेही भाव गगनाला भिडलेले आहेत.

कढीपत्ता कफ आणि पित्त दोष संतुलित करतो, तसेच ताप, अतिसारात गुणकारी आहे. यात व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, कॅल्शियम असते. डोळ्यांसाठी देखील कढीपत्त्याचा रस चांगला असतो. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने कढीपत्ता गुणकारी आहे. आयुर्वेदानुसार आहारात तिखट, कडू आणि तुरट घटक असले पाहिजेत. कढीपत्ता



इतर पदार्थांसोबत मिसळणारा घटक असून, त्याशिवाय खाद्यपदार्थ परिपूर्ण होत नाही.

चिवडा, पोहे, वरण, भाजी, कढी, मठ्ठा, सांबर आदी आहारातील पदार्थांमध्ये कढीपत्ता रोज लागतो. घरगुती ग्राहकांसह हॉटेल, भोजनालय येथे वर्षभर मागणी असते. सध्या बाजारपेठेत कढीपत्त्याची आवक चांगली असली तरी दर महागलेले असल्याने कढीपत्त्याचा वापर कामापुरता केला जात आहे. दहा रुपयांना एक जुडी विक्री होत असल्याची माहिती विक्रेते सय्यद शमशुद्दीन यांनी दिली. शहरातील भाजीपाला बाजारपेठेत कढीपत्त्याची प्रति किलो किंमत तीनशे रुपये झाली आहे. त्यामुळे दहा ते वीस रुपयांत एखादी जुडी मिळत आहे. कढीपत्त्याच्या झाडावर लिफ स्पॉट मोठ्या प्रमाणावर आढळत आहेत. पानांवर काळे, पांढरे, तसेच खवले अशाप्रकारे ठिपके पडून पानगळतीमुळे उत्पादन घटले आहे.

### येथून येतो शहरात कढीपत्ता

नगर तालुक्यातील वाळकी, रुई, चिचोंडी पाटील, भातोडी, पिंपळगाव, पोखर्डी, जखणगाव, बाबुर्डी, चास, निमगाव येथून नगरच्या बाजारात कढीपत्ता येतो. या परिसरातील शेतकरी कढीपत्त्याची लागवड करतात. तसेच नेवासा, पारनेर, श्रीगोंदा, श्रीरामपूर, राहुरी तालुक्यातही मोठ्या प्रमाणात कढीपत्त्याची लागवड होते.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.